विभाग दुसरा

शेतमजुरांचा खर्च

४·१ :

शेतमजुरांना मिळणारे उत्पन्न व त्यांचा खर्च यांची तुलना आपण या प्रकरणातील पहिल्या भागात केली आहे· शेतमजुरांकडून जीवनावश्यक गरजा, इतर गरजा, व्यसने, इंधने, कपडे, पादत्राणे, वैद्यकीय सेवा, मनोरंजन, प्रसाधने, सुखसोयींच्या वस्तू, शिक्षण, भांडी, इतर खर्च व दागिने यावर खर्च केला जातो·

शेतमजुरांकडून वरील सर्व वस्तू व सेवांवर जो एकूण खर्च केला जातो त्या एकूण खर्चाची सर्व वस्तुवरील खर्चाशी असलेली टक्केवारी पाहिली असता असे निदर्शनास येते· प्रत्येक शेतमजूर आपल्या आवश्यकतेप्रमाणे, कुवतीप्रमाणे, वस्तुंवरील खर्च कमीजास्त प्रमाणामध्ये करीत असतात·

शेतमजुरांच्या एकूण खर्चाची या सर्व वस्तू व सेवांवरील खर्चाशी असणारी टक्केवारी पुढीलप्रमाणे दिसून येते·

४·१ अ : जीवनावश्यक गरजांवरील खर्च :-

शेतमजुरांच्या एकूण खर्चाची जीवनावश्यक वस्तुवरील खर्चाशी टक्केवारी पाहीली असता असे दिसून येते की ९३ अल्पभूधारक शेतमजुरांमधील सात (७·५३ टक्के) शेतमजूर एकूण खर्चाच्या ४० टक्के पर्यंत खर्च जीवनावश्यक गरजांवर करतात· ४९ (५२·६९ टक्के) शेतमजूर ४०·१ ते ५५ टक्के पर्यंत, छत्तीस (३८·७१ टक्के) शेतमजूर, ५५·१ ते ७० टक्के पर्यंत तर एक (१·०८ टक्के) शेतमजूर ७०·१ टक्केपेक्षा जास्त खर्च जीवनावश्यक गरजांवर करतात·

भूहीन शेतमजुरांपैकी दोन (९·०९ टक्के) शेतमजूर एकूण खर्चाच्या ४० टक्केपर्यंत, १२ (५४·५५ टक्के) शेतमजूर ४०·१ ते ५५ टक्केपर्यंत तर आठ (३६·३६ टक्के) शेतमजूर ५५·१ ते ७० टक्केपर्यंत जीवनावश्यक गरजावर खर्च करतात·

खंडकरी शेतमजुरांमधील एक (२० टक्के) शेतमजूर एकूण खर्चाच्या ४० टक्केपर्यंत, तीन (६० टक्के) शेतमजूर ४०·१ ते ५५ टक्केपर्यंत तर एक (२० टक्के) शेतमजूर ५५·१ ते ७० टक्केपर्यंत जीवनावश्यक गरजावर खर्च करतात·

सर्व १२० शेतमजुरांचा विचार करता असे दिसून येते की, ६४ (५३·३३ टक्के) शेतमजूर एकूण खर्चाच्या ४०·१ ते ५५ टक्केपर्यंत, ४५ (३७·५४ टक्के) शेतमजूर एकूण खर्चाच्या ५५·१ ते ७० टक्केपर्यंत तर एक (०·८३ टक्के) शेतमजूर एकूण खर्चाच्या ७०·१ टक्केपेक्षा जास्त खर्च जीवनावश्यक गरजांवर करतात·

४·१ बी : <u>इतर गरजांवरील खर्च</u> :-

अल्पभूधारक शेतमजुरांमधील ४२ जण (४५·१६ टक्के) शेतमजूर या गटातील वस्तंवर खर्च न करणारे आहेत· १७ (१८·१८ टक्के) शेतमजूर एक टक्क्यापर्यंत, १८ (१९·३५ टक्के) शेतमजूर १·१ ते ३ टक्केपर्यंत तर सोळा (१७·२० टक्के) शेतमजूर एकूण खर्चाच्या ३·१ टक्क्यापेक्षा जास्त खर्च इतर गरजांवर करतात·

भूहीन शेतमजुरांपैकी दहा (४५·४५ टक्के) शेतमजूर इतर गरजांवर खर्च न करणारे, तीन (१३·६४ टक्के) शेतमजूर, एक टक्क्यापर्यंत, सातजण (३१·८२ टक्के) शेतमजूर १·१ ते ३ टक्केपर्यंत तर दोन (९·०९ टक्के) शेतमजूर एकूण खर्चाच्या ३·१ टक्क्यापेक्षा जास्त खर्च इतर गरजांवर करतात·

खंडकरी शेतमजुरांमधील चार (८० टक्के) शेतमजुर १·१ ते ३ टक्के-पर्यंत तर एक (२० टक्के) शेतमजूर ३·१ टक्क्यापेक्षा जास्त खर्च करतात·

सर्व शेतमजुरांचा विचार करता असे आढळून येते की, ५२ (४३·३३ टक्के) खर्च न करणारे,२९ (२४·१७ टक्के) शेतमजूर, १·१ ते ३ टक्क्यापर्यंत खर्च करणारे तर १८ (१५·३३ टक्के) शेतमजूर, आपल्या एकूण खर्चापैकी ३·१ टक्क्यापेक्षा जास्त खर्च इतर गरजांवर करतात·

४·१ सी : व्यसनावरील खर्च :-

अल्पभूधारक शेतमजुरांपैकी बारा (१२·९० टक्के) शेतमजुरांना कोणतेही व्यसन नाही· चौदा (१५·०५ टक्के) शेतमजूर ३ टक्केपर्यंत, चौतीस (३६·५६ टक्के) शेतमजूर ३·१ ते ७ टक्क्यापर्यंत तर ३३ ((३५·४८ टक्के) शेतमजूर ७·१ टक्केपेक्षा जास्त खर्च व्यनावर करतात·

भूहीन शेतमजुरांमधील एक (४·५५ टक्के) शेतमजूर व्यसन नसणारा आहे· तर दोन (९·०९ टक्के) शेतमजूर, तीन टक्क्यापर्यंत, सात (३१·८२ टक्के) शेतमजूर ३·१ ते ७ टक्क्यापर्यंत तर बारा (५४·५५ टक्के) शेतमजूर ७·१ टक्क्यापेक्षा जास्त खर्च व्यनावर करतात·

खंडकरी शेतमजुरांमधील एक (२० टक्के) शेतमजूर तीन - टक्क्यापर्यंत, दुसरा (२० टक्के) शेतमजूर तीन ते सात टक्क्यापर्यंत; तीन (६० टक्के) शेतमजूर सात टक्क्यापेक्षा जास्त खर्च व्यसनावर करतात·

थोडक्यात सर्व शेतमजुरांपैकी तेरा (१०·८३ टक्के) शेतमजूर, व्यसने नसणारे, आहेत· व्यसनावर खर्च करणा-या १०७ (८९·१७ टक्के) शेतमजुरांपैकी ४८ (४० टक्के) शेतमजूर सात टक्क्यापेक्षा जास्त खर्च करणारे तर ४२ (३५ टक्के) शेतमजूर ३·१ ते ७ टक्क्यांपर्यंत खर्च करणारे आहेत·

४·१ डी : इंधनावरील खर्च :-

शेतमजुरात इंधनावरील खर्चाचे प्रमाण कमी आहे· एकूण खर्चाच्या आठ टक्केपेक्षा जास्त इंधनावर खर्च करणारे फक्त सहाजण (५ टक्के) आहेत·

६५ (५४·१७ टक्के) शेतमजूर चार टक्क्यांपेक्षा कमी खर्च इंधनावर करतात· तर ४९ (४०·८३ टक्के) शेतमजूर चार ते आठ टक्क्यांपर्यंत खर्च इंधनावर करतात· इंधनावरील खर्चाचे प्रमाणे अल्पभूधारक शेतमजुरात जास्त आहे·

४·१ ई : कपड्यांवरील खर्च :-

खांडकरी शेतमजुरांपैकी सर्वजण कपड्यावर दहा ते वीस टक्के खर्च करणारे आहेत· या खर्च गटात एकूण शेतमजुरांपैकी ९० (७५ टक्के) जण येतात· तर वीस जण (१६·६७ टक्के) वीस टक्क्यांपेक्षा जास्त खर्च कपड्यावर करतात· दहा टक्क्यांपेक्षा कमी खर्च करणारे फक्त दहा (८·३३ टक्के) जण आहेत·

४·१ एफ्· : पादत्राणावरील खर्च :-

पादत्राणावरील खर्चाचे प्रमाण एकूण खर्चाच्या चार टक्क्यांपेक्षा कमी आहे· सर्व शेतमजुरांपैकी दोन टक्क्यांपर्यंत पादत्राणांवर खर्च करणारे १११ (९२·५ टक्के) जण आहेत·

४·१ जी : वैधकीय सेवावरील खर्च :-

वैधकीय सेवावरील खर्च इतका कमी आहे की एकतर कोणी आजारी पडत नसावेत अथवा आजार बरा होत नसल्यासच औषधोपचारासाठी लोक डॉक्टरकडे जात असावेत· २५ (२०·८३ टक्के) कुटुंबाचा वैधकीय सेवांवरील खर्च दीड टक्क्यांपेक्षा कमी आहे· तर दीड टक्के ते चार टक्के खर्च करणारी ५३ (४४·१७ टक्के) कुटुंबे आहेत· नऊ (७·५ टक्के) कुटुंबे अर्धा टक्क्यांपेक्षा कमी खर्च करणारे आहेत·

····१३/-

४·१ एच : <u>मनोरंजनावरील खर्च</u> :-

एकूण खर्चाच्या प्रमाणात मनोरंजनावरील खर्च फारच अल्प प्रमाणात आहे· ८३ (६९·१७ टक्के) जण तीन टक्क्यांपर्यंत खर्च करणारे आहेत· तर सदतीस (३०·८३ टक्के) शेतमजूर तीन टक्क्यांपेक्षा जास्त खर्च मनोरंजनावर करतात·

४·१ आय : <u>प्रसाधनांवरील खर्च</u> :-

त्यामानाने प्रसाधनावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण जास्त आहे· चाळीस (३३·३३ टक्के) जण तीन टक्क्यांपर्यंत प्रसाधनावर खर्च करतात· तर उरलेले ८० (६६·६० टक्के) शेतमजूर तीन टक्क्यांपेक्षा जास्त खर्च प्रसाधनावर करतात·

४·१ जे : <u>सुखासोईवरील खर्च</u> :-

सर्व शेतमजुरांचा विचार करता असे दिसून येते की सर्व १२० शेतमजुरांमधील ४८ (४० टक्के) शेतमजूर सुखासोईंवर खर्च न करणारे आहेत· तर खर्च करणाऱ्या ७२ (६० टक्के) शेतमजुरांपैकी ६९ (५७·५ टक्के) शेतमजूर एकूण खर्चाच्या एक टक्क्यापर्यंत खर्च करतात·

४·१ के : <u>शिक्षणावरील खर्च</u> :-

शिक्षणावरील शेतमजुरांच्या खर्चाचा आढावा घेता असे दिसून येते की शिक्षणावरील खर्च शेतमजुरांच्या दृष्टीने फारसा महत्वाचा नाही· कारण ३८ (३१·६७ टक्के) शेतमजूर शिक्षणावर अजिबात खर्च करीत नाहीत· खंडकरी व भूहीन शेतमजुरात कोणीही पाच टक्क्यांपेक्षा जास्त खर्च शिक्षणावर करीत नाहीत· अल्पभूधारक शेतमजुरांमध्ये

दहा टक्केपर्यंत शिक्षणावर खर्च करणारे ६१ (६५·५९ टक्के) शेतमजूर आहेत· तर त्यापेक्षा जास्त शिक्षणावर खर्च करणारे फक्त दोन (२·१५ टक्के) शेतमजूर आहेत·

४·१ एल : भांड्यावरील खर्च :-

भांड्यावरील खर्चाचा विचार करता असे आढळून येते की सर्व १२० शेतमजुरांपैकी ७२ (६० टक्के) शेतमजूर एक टक्क्यांपर्यंत, २५ (२०·८३ टक्के) शेतमजूर, एक ते तीन टक्क्यांपर्यंत तर सोळा (१३·३३ टक्के) भांड्यावर खर्च न करणारे आहेत· व सर्वजण अल्पभूधारक शेतमजूर आहेत·

४·१ एम् : शेतमजुरांच्या इतर बाबींवरील खर्चाचा विचार केल्यास असा निष्कर्ष निघातो की शेतमजुरांचा इतर बाबींवरील खर्चही नगण्य आहे· सर्व शेतमजुरांपैकी ७२ (६२·५ टक्के) शेतमजूर एकूण खर्चाच्या २·६ टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करतात· ४१ (३४·१७ टक्के) शेतमजूर २·५ टक्क्यांपर्यंत खर्च करतात· चार (३·३३ टक्के) शेतमजूर ०·५ टक्क्यांपर्यंत खर्च करतात·

४·१ : एन् : दागिन्यावरील खर्च :-

अल्पभूधारक शेतमजुरांपैकी ७८ (८३·८७ टक्के) शेतमजूर खर्च न करणारे, दोन (२·१५ टक्के) शेतमजूर एक टक्क्यांपर्यंत खर्च करणारे, चार (४·३० टक्के) शेतमजूर एक ते दहा टक्क्यांपर्यंत खर्च करणारे तर नऊ (९·६८ टक्के) शेतमजूर दहा टक्केपेक्षा जास्त खर्च करणारे आहेत·

भूहीन शेतमजुरांपैकी वीस (९०·९१ टक्के) शेतमजूर दागिन्यावर खर्च न करणारे तर उरलेले दोन (९·०९ टक्के) शेतमजूर एक ते दहा टक्केपर्यंत खर्च करतात·

....१५/-

बांडकरी शेतमजुरांपैकी चार (८० टक्के) शेतमजूर खर्च न करणारे तर उरलेला एक (२० टक्के) शेतमजूर दहा टक्क्यापेक्षा जास्त खर्च करतात·

सर्व शेतमजुरांचा विचार केल्यास असे निदर्शनास येते की, १०२ (८५ टक्के) शेतमजूर दागिन्यावर खर्च न करणारे आहेत· दागिन्यावर खर्च करणाऱ्या अठरा (१५ टक्के) शेतमजुरांपैकी आठ (२·६७ टक्के) शेतमजूर दहा टक्क्यापर्यंत तर दहा (८·३३ टक्के) शेतमजूर दहा टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करणारे आहेत·

या विभागात दुसऱ्या भागात शेतमजुरांचे विविध गटांतील प्रत्येक वस्तुंवर होणाऱ्या खर्चाचा आढावा घेतला आहे· खर्चाच्या जवळजवळ ६० टक्के भाग फक्त अन्नधान्यावर खर्च होत असल्यामुळे इतर बाबींवर खर्च करण्याची कुवत शेतमजुरांमध्ये रहात नाही· व्यवसानवर साधारणपणे एकूण खर्चाच्या पाच टक्के रक्कम खर्च होते· इतर गरजांवर तीन टक्के, इंधनावर चार टक्के खर्च होतो· कपड्यांवर एकूण खर्चाच्या पंधरा टक्के रक्कम खर्ची पडते· पादत्राणे दोन टक्के, वैद्यकिय सेवा दिड टक्का, शिक्षण पाच टक्के, दागिन्यावर एक टक्का व राहिलेले साडे-चार टक्के उत्पन्न प्रासंगिक खर्च व बचत यात विभागले जात असतात·

४·२ शेतमजुरांकडून प्रत्येक प्रकारच्या गटातील वस्तूंवर अथवा सेवांवर केलेल्या खर्चाचे विश्लेषण या प्रकरणातील पहिल्या भागात पाहिले आहे· याठिकाणी आपण प्रत्येक गटांमध्ये समाविष्ट असणाऱ्या प्रत्येक वस्तूंवरील खर्चाचे प्रमाण कसे आहे याची पाहणी करणार आहोत· यासाठी प्रत्येक गटांवर केला जाणारा खर्च शंभर टक्के आहे असे मानून त्या प्रत्येक गटातील प्रत्येक वस्तुंवरील खर्चाची टक्केवारी कशी आहे हे पाहिले आहे· यामध्ये यासाठी प्रत्येक गटातील सर्व वस्तुंवर केला जाणारा खर्च हा पाया मानला आहे·

... ९६/-

४·२·अे·१ :

अल्प भू-धारक शेतमजूर वाढत्या खर्चाच्या संदर्भात जीवनावश्यक वस्तूंवर वाढत्या प्रमाणात खर्च करतात· असा खर्च वाढत जात असताना धान्यावरील खर्चाच्या प्रमाणात कमी वाढ होत जाणे अपरिहार्य आहे· उदाहरणार्थ ५,००० रुपयांपर्यंत खर्च असणाऱ्या अल्प भू-धारक शेतमजुरास जीवनावश्यक वस्तुंवर केल्या जाणाऱ्या खर्चापैकी धान्यावर ४० टक्केपेक्षा जास्त खर्च करणाऱ्यांचे प्रमाण ५० टक्के आहे· ते प्रमाण ५,००१ ते ७,००० रुपयेपर्यंत खर्च गटात २४·५६ टक्के तर ७,००१ रुपयांपेक्षा जास्त खर्च गटात १७·५२ टक्के आहे·

या ९३ अल्प भू-धारकांपैकी कडधान्याचा वापर न करणारे पाच (५·३८ टक्के), डाळीचा वापर न करणारे दोन (२·१५ टक्के), दुधाचा वापर न करणारे २८ (३०·१ टक्के), तसेच वनस्पती तेलाचा वापर न करणारे ९१ (९७·८५ टक्के) शेतमजूर आहेत· एकूण खर्चाच्या तीन ते पाच टक्के खर्च प्रत्येकी कडधान्ये, भाजीपाला व डाळीवर खर्च करणारे अनुक्रमे ५३·७६ टक्के, ३९·७८ टक्के, व ४४·०८ टक्के इतके आहेत· ५,००० रुपयांपर्यंत खर्च असणाऱ्या अल्प भू-धारक शेतमजुरात कडधान्य, भाजीपाला व डाळींवर एकूण खर्चाच्या तीन ते पाच टक्के खर्च - करणारांचे प्रमाण अनुक्रमे ८५·७१ टक्के, ५७·१४ टक्के, व ५७·१४ टक्के आहे· ५,००१ ते ७,००० रुपये खर्च असणाऱ्यात ते प्रमाण अनुक्रमे ४७·३७ टक्के, ३५·०८ टक्के, व ४७·३७ टक्के होते· व ७,००१ रुपयांपेक्षा जास्त खर्च गटातील शेतमजुरात हे प्रमाण अनुक्रमे १४·२१ टक्के, ४७·३७ टक्के, व ३१·५८ टक्के होते· एकूण खर्च वाढत असता दुधावरील खर्चाच्या प्रमाणात बदल झालेला दिसतो· उदाहरणार्थ ५,००० रुपयांपर्यंतच्या खर्च गटात दुधावर एकूण खर्चाच्या ५ ते १० टक्के खर्च करणाऱ्यांचे आधिक्य

तर पुढील (५,००१ ते ७,००० रुपयांपर्यंत) खर्च गटात १० ते १५ टक्के खर्च करणा-यांचे आधिक्य होते. तेलावरील खर्चाच्या बाबतीत मात्र बहुतेकांचा खर्च १० ते १५ टक्क्यांच्या दरम्यान आहे.

अल्प भू-धारक शेतमजुरांमध्ये मासे खाणारांची संख्या फारच अल्प आहे. मांस आणि अंडी खाणा-यांचे प्रमाण अधिक असले तरी त्यावरील खर्च मात्र अल्प आहे. मांसावर एकूण खर्चाच्या ५ ते १० टक्के खर्च करणारे ५२ (५५.९१ टक्के) तर अंड्यांवर दोन टक्क्यांपेक्षा कमी खर्च करणा-यांचे प्रमाण ६२ (६६.६७ टक्के) आहे.

गुळापेक्षा साखरेवर होणा-या खर्चाचे प्रमाण जास्त व जास्त खर्च गटांमध्ये असणा-यांचे प्रमाण जास्त आहे. गुळावर ६६.६७ टक्के शेतमजूर अर्धा टक्क्यांपेक्षा कमी खर्च करतात. तर साखरेवर ५४.८४ टक्के शेतमजूर ५ ते १० टक्के व ३७.६३ टक्के शेतमजूर दहा ते पंधरा टक्के साखरेवर खर्च करतात. चहावरील खर्चाचे बहुतेक प्रमाण दोन ते चार टक्के आहे. फळांवर बहुतेक शेतमजुरांचा खर्च जीवनावश्यक खर्चावरील एकूण खर्चाच्या दोन टक्क्यांपेक्षा कमी आहे. तसेच मसाल्यावर बहुतेक सर्व शेतमजूर सात ते दहा टक्के खर्च करतात.

अे.२ :-

जीवनावश्यक वस्तुंवर केल्या जाणा-या खर्चाच्या प्रमाणाच्या तुलनेने व्यसनांवरील खर्चाचे प्रमाण जास्त आहे. एकूण ९३ अल्प भू-धारक शेतमजुरांपैकी फक्त १२ जण (१२.९० टक्के) शेतमजूर व्यसनमुक्त आहेत. व्यसनामध्ये पान, तंबाखू व दारु ही मुख्य व्यसने आहेत. पान, तंबाखूवरील खर्चाचे प्रमाण व्यसनावरील एकूण खर्चाशी असलेले प्रमाण एकूण खर्च कमी

असला अथवा जास्त असला तरी साधारणपणे तेवढाच म्हणजे पन्नास टक्केपेक्षा जास्त आहे. दारूवर केल्या जाणाऱ्या खर्चाचे एकूण खर्चाशी प्रमाण २५ ते ५० टक्के व ५० टक्क्यांपेक्षा जास्त असणाऱ्यांचे प्रमाण जवळजवळ सारखेच आहे.

अ.३ :-

इंधनात रॉकेल व वीज यांचा प्रामुख्याने वापर होतो. सरपण न वापरणारे ५६ (६०.२२ टक्के) आहेत. इंधनावर होणाऱ्या खर्चापैकी वीजेवर २५ ते ५० टक्के खर्च करणारे ३३ (३५.४८ टक्के) व पन्नास टक्केपेक्षा जास्त खर्च करणारे वीस (२१.५१ टक्के) आहेत. रॉकेलवर तीस टक्केपर्यंत खर्च करणारे चाळीस (४३.०१ टक्के) तर साठ टक्केपेक्षा जास्त खर्च करणारे अठ्ठावीस (३०.१० टक्के) आहेत.

अ.४ :-

अल्प भू-धारक शेतमजुरांचा कपड्यावर होणारा खर्च पाहिला तर स्त्रीया व मुलींच्या कपड्यावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. पुरुषांच्या कपड्यांवर होणारा खर्च एकूण कपड्यावरील खर्चाच्या तुलनेने १५ ते ४० टक्क्याच्या घरात आहे. तर स्त्रीयांच्या कपड्यावरील खर्चाचे तुलनात्मक प्रमाण वीस ते चाळीस टक्क्यापेक्षा जास्त, मुलांच्या कपड्यांवरील खर्चाची मर्यादा २५ टक्क्यांपासून चाळीस टक्क्यांपेक्षा जास्त अशी आहे. तर मुलींच्या कपड्यांवरील खर्चाचे कपड्यावरील एकूण खर्चाशी असलेले प्रमाण मुख्यत्वे पंधरा ते पंचवीस टक्के इतके आहे. एकूण खर्चाच्या वाढत्या प्रमाणाबरोबर कपड्यांवरील खर्चाची (स्लॅब) पातळी बदललेली आढळते.

अ·५ :-

मनोरंजनामध्ये करमणुकीवर खर्च करणाऱ्यांचे ४७ (५०·५४ टक्के) व खर्च न करणाऱ्यांचे बेचाळीस (४५·१६ टक्के) प्रमाण जवळजवळ सारखेच आहे· खेळ साहित्यावर फक्त दोघेजण (२·१५ टक्के) तेही एकूण खर्च ६,००० रुपयेपेक्षा जास्त असलेले खर्च करतात· वृत्तपत्र कोणीही विकत घेत नाही· यात्रेवरील खर्चाचे प्रमाण जास्त आहे· मनोरंजनावर खर्च होणाऱ्या एकूण रकमेच्या ७५ टक्केपेक्षा जास्त खर्च यात्रेवर खर्च करणाऱ्या शेतमजुरांचे प्रमाण एकूण अल्प भू-धारक शेतमजुरात पन्नास टक्के इतके जास्त आहे·

अ·६ :-

सौंदर्य प्रसाधनांमध्ये कापडाच्या साबणावरील खर्चाचे प्रमाण जास्त आहे· ५,००० रुपयांपर्यंत एकूण खर्च करणाऱ्या शेतमजुरांमध्ये अंगाच्या साबणावर दहा ते वीस टक्के खर्च करणारांचे प्रमाण जास्त आहे· तर ५,००१ रुपयांपेक्षा जास्त खर्च करणारात ते वीस टक्क्यांपेक्षा जास्त आहे· दंतमंजनावर अजिबात खर्च न करणारे बत्तीस (३४·४० टक्के) आहेत· तर पाच ते पंधरा टक्के खर्च करणारे ४६ (४९·४६ टक्के) आहेत· गंध, पावडरीवर खर्च न करणारे एकूण ८४ टक्के आहेत· कुटुंबनियोजनाच्या साधनावर खर्च असा कोणासही करावा लागत नाही· तसेच दाढीच्या सामानावरही खर्च करणारे शेतमजूर विरळच आहेत·

अ·७ :-

सुखसोईवर आडतीस (४०·८६ टक्के) लोक अजिबात खर्च करीत

··· १००/-

नाहीत· बॅटरी, कुलपे, बल्ब, टयुब, चष्मे, फर्निचर, वीजेचा पंखा, कॉट, गादी या वस्तुंचा या गटात समावेश केला होता· या गटातील वस्तुंवर होणा-या खर्चापैकी सत्तर टक्केपेक्षा जास्त खर्च वीजेचा बल्ब व टयुब यावर शेतमजुरांकडून केला जातो·

अे·८ :-

शैक्षणिक वस्तुंवर खर्च करणा-यांपैकी २५ ते ५० टक्के खर्च पुस्तकावर तसेच वहयांवर होत असतो· लेखन साहित्यावर पाच ते पंचवीस टक्क्यांपर्यंत खर्च केला जातो· एकूण खर्चाच्या वाढीबरोबर या वस्तुंवरील खर्चाचे प्रमाण वाढत जाताना आढळून येत नाही·

अे·९ :-

भांड्यांवर केल्या जाणा-या एकूण खर्चात अॅल्युमिनियमच्या व त्या खालोखाल तांब्यांच्या भांड्यांवर खर्च करणा-या व्यक्तींचे प्रमाण जास्त आहे· प्लॅस्टिकच्या वस्तू शेतमजुरांमध्ये अजुनही लोकप्रिय झालेल्या दिसून येत नाहीत· ५,००१ रूपयांपेक्षा जास्त खर्च करणा-या शेतमजुरात स्टेनलेस स्टिलच्या भांड्यांवर खर्च करणारांचे प्रमाण कमी आहे· काच सामानाच्या बाबतीतही हीच परिस्थिती असल्याचे आढळून येते· भांड्यांवर केल्या जाणा-या एकूण खर्चामध्ये झाडूवर सत्तर टक्केपेक्षा जास्त खर्च करणा-या शेतमजुरांचे प्रमाण २९ (३१·१८ टक्के) आहे·

अे·१० :-

घर दुरुस्ती, वाहन खर्च, केस कापण्यावरील खर्च, यांचा

विचार केल्यास मुख्यत्वे वाहन खर्च व केस कापण्यावर खर्च केला जातो. पन्नास टक्केपेक्षा जास्त शेतमजूर वाहन खर्च व केस कापण्यावर २५ ते ६० टक्केपेक्षा जास्त खर्च करतात. अगदीच कमी शेतमजूर घर दुरुस्तीवर खर्च करतात.

ए.११ :-

सोन्या-चांदीच्या दागिन्यावर खर्च करणारे अभावानेच आढळतात. ८६ (९२.४७ टक्के) शेतमजूर सोन्याच्या दागिन्यांवर, खर्च न करणारे आहेत. तर ८४ (८०.३२ टक्के) शेतमजूर चांदीच्या दागिन्यांवर खर्च न करणारे आहेत.

४.२.बी :-

बावीस भूहीन शेतमजुरांच्याकडून वरीलप्रमाणे या प्रत्येक गटातील वस्तुंवर केल्या जाणा-या खर्चाच्या प्रमाणाचा विचार आपण याठिकाणी करणार आहोत.

बी.१ : भूहीन शेतमजुरांच्या वाढत्या खर्चाबरोबर जीवनावश्यक वस्तुंवरील

खर्चाचे प्रमाण वाढत आहे. शेतमजुरांची खर्चाची पातळी जशी वाढत जाते. तशी धान्यावरील खर्चाची पातळी कमी होत जाते असे आढळून येते. ५,५०० रुपये खर्चाच्या पातळीपर्यंत धान्यावर चाळीस ते पंचावन्न टक्क्यांपर्यंत खर्च करणारांचे प्रमाण जास्त आहे. तर ५,५०१ रुपयेपेक्षा जास्त खर्च गटामध्ये ३०.१ ते ४० टक्क्यांपर्यंत धान्यावर खर्च करणारांचे प्रमाण जास्त आहे.

... १०२/-

या बावीस भूहीन शेतमजुरांपैकी कडधान्यावर खर्च न करणारे दोन, डाळीचा वापर न करणारा एक, तर दुधाचा वापर न करणारे सात शेतमजूर आहेत. तसेच वनस्पती तेलाचा वापर न करणारे २१ शेतमजूर आहेत. एकूण खर्चाच्या तीन ते पाच टक्केपर्यंत कडधान्य, भाजीपाला, डाळी यावर खर्च केला जातो. दुधावरील खर्चाचा विचार करता असे दिसून येते की ५,५०० रुपये खर्च गटांमध्ये दुधावर खर्च न करणारे पाच (२२.७३ टक्के) शेतमजूर आहेत. तर ५,५०१ रुपयेपेक्षा जास्त खर्च गटामध्ये सात (३१.८२ टक्के) शेतमजूर पाच टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करणारे आहेत. कडधान्ये, भाजीपाला व डाळीवर पाच टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करणारे अनुक्रमे तीन (१३.६४ टक्के), चार (१८.१८ टक्के) व चार (१८.१८ टक्के) आहेत. वनस्पती तेलांवर बहुतेक खर्चाचा अभावच आहे. परंतु तेलावरील खर्चाच्या बाबतीत मात्र दहा ते पंधरा टक्क्यांपर्यंत बहुतेक सर्व शेतमजूर खर्च करतात.

भूहीन शेतमजुरांमध्ये मासे खरेदी करणा-या शेतमजुरांची संख्या फारच अल्प आहे. १९ (८६.३६ टक्के) शेतमजूर मासे न खरेदी करणारे आहेत. मांस व अंडी यावरील खर्चाचे प्रमाण जास्त मजुरांचे दिसत असले तरी यावर केला जाणारा खर्च मात्र अल्प प्रमाणामध्ये केला जातो. अंडयावर दोन टक्क्यांपेक्षा कमी खर्च करणारे सतरा (७७.२७ टक्के) तर मांसावर पाच ते दहा टक्के पर्यंत खर्च करणा-या शेतमजुरांची संख्या १९ (८६.३६ टक्के) आहे.

गुळावरील खर्चाचे प्रमाण साखरेवरील खर्चाच्या प्रमाणाच्या तुलनेने खूपच कमी वाटते. चौदा (६३.६४ टक्के) शेतमजूर गुळावर अर्धा टक्क्यांपेक्षा कमी व चार (१८.१८ टक्के) शेतमजूर अर्धा ते एक टक्क्यांपर्यंत खर्च करतात. मात्र तेरा (५९.०९ टक्के) शेतमजूर साखरेवर दहा ते पंधरा टक्के तर नऊ (४०.९१ टक्के) शेतमजूर पाच ते दहा टक्केपर्यंत रक्कम साखरेवर

खर्च करतात. ५५०० पेक्षा कमी खर्च गटांमध्ये गुळावरील खर्चाचे प्रमाण थोडेसे जास्त आहे. चहावरील खर्च मात्र बहुतेक सर्व २१ (८५.४५ टक्के) शेतमजुरात दोन ते चार टक्क्यांदरम्यान आहे. फळावर केल्या जाणाऱ्या खर्चाचा विचार केल्यास बारा (५४.५५ टक्के) शेतमजूर दोन टक्क्यांपेक्षा कमी खर्च करतात. यामध्ये ५,५०० रुपयांपेक्षा कमी खर्च गटातील ६६.६७ टक्के शेतमजूर आहेत. तर दहा (४५.४५ टक्के) शेतमजुर फळावर दोन टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करतात. यामध्ये ५,५०१ पेक्षा जास्त खर्च असणारे ६० टक्के शेतमजूर आहेत. मसाल्यावर केल्या जाणाऱ्या खर्चामध्ये बहुतांशी शेतमजूर सात ते दहा टक्क्यांदरम्यान खर्च करतात.

<u>बी;२</u> : इतर गरजांवर केल्या जाणाऱ्या खर्चामध्ये दहा (४५.४५टक्के) शेतमजूर इतर गरजांवर खर्च नकरणारे आहेत तर बारा (५४.५५ टक्के) शेतमजूर बिस्कोटांवर ५० टक्केपेक्षा जास्त खर्च करतात. इतर वस्तुवरील खर्चाचे प्रमाण अत्यल्प आहे.

<u>बी.३</u> : व्यसनावरील खर्चाचे प्रमाण जीवनावश्यक गरजा किंवा इतर गरजांवरील खर्चाच्या मानाने खूप जास्त आहे. फक्त एक (४.५५ टक्के) शेतमजूर व्यसनमुक्त आहे. व्यसनामध्ये प्रामुख्याने पान-तंबाखू व दारु यांचे प्रमाण जास्त दिसून येते. पान-तंबाखू व दारुवरील खर्चाच्या रकमांमध्ये सारखेपणा आढळून येतो. परंतु पान-तंबाखूमध्ये ५० टक्केपेक्षा जास्त खर्च करणाऱ्यांची संख्या जास्त आहे.

<u>बी.४</u> : भूहीन शेतमजूर इंधनामध्ये प्रामुख्याने रॉकेलचा वापर करतात. नऊ (४०.९१ टक्के) शेतमजूर वीज व सरपणाचा वापर न करणारे आहेत. सरपण (लाकडे) व वीज यावर केल्या जाणाऱ्या खर्चामध्ये सारखेपणा दिसून येतो. वीजेवर ५० टक्केपेक्षा जास्त खर्च करणारे शेतमजूर चार (१८.१८ टक्के) आहेत.

....१०४/-

रॉकेलवर केला जाणारा खर्च इंधनावरील एकूण खर्चापैकी ६० टक्क्यांपेक्षा जास्त आठ (३६·३६ टक्के) शेतमजूर करतात· तर तीस टक्क्यांपर्यंत खर्च नऊ (४०·९१ टक्के) शेतमजूर करतात·

बी·५ : भूहीन शेतमजूरांचा कपड्यावर होणारा खर्च पाहिला असता असे आढळून येते की या खर्चामध्ये स्त्रीया व मुलांच्या कपड्यांवर केल्या जाणाऱ्या खर्चाचे प्रमाण जास्त आहे· स्त्रीयांच्या कपड्यांवर तीस टक्क्यांपेक्षा जास्त व मुलांच्या कपड्यावर पंचवीस टक्क्यांपेक्षा जास्त खर्च प्रत्येकी चौदा (६३·६४ टक्के) शेतमजूर करतात· मुलींच्या कपड्यावर केल्या जाणाऱ्या खर्चामध्ये २५ ते ४० टक्क्यांपर्यंत खर्च करणाऱ्यांची संख्या नऊ (४०·९१ टक्के) आहे· पुरुषांच्या कपड्यावर केल्या जाणाऱ्या खर्चा बाबत असे दिसून येते की बहुतेक शेतमजुरांचा हा खर्च पंधरा ते चाळीस टक्क्यांपर्यंत आहे·

बी·६ : मनोरंजनावरील खर्च सर्व २२ भूहीन शेतमजूर करतात· यामध्ये करमणुकीवर खर्च नकरणारे पाच (२२·७३ टक्के) आहेत· तर वीस टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करणारे पंधरा (६८·१८ टक्के) आहेत· खेळाचे साहित्य, पेपर व रेडिओहे खरेदीवर कोणीही खर्च करीत नाहीत· यात्रेपर ५० टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करणाऱ्या बारा (५४·५५ टक्के) शेतमजुरांपैकी आठ (३६·३६ टक्के) शेतमजुर ७५ टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करणारे आहेत·

बी·७ : सौंदर्यप्रसाधनावरील खर्चामध्ये कपड्याच्या साबणावरील खर्चाचे प्रमाण जास्त आहे· ५,५०० रुपयांपर्यंतच्या खर्च गटांमध्ये साबणावर जास्त खर्च करणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे· अंगाच्या साबणावरील खर्च, खर्चाची पातळी जशी वाढत जाते तसा वाढत जातो· ५,५०० रुपयांपर्यंत खर्च या गटामध्ये वीस टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करणारे नऊ जण तर वीस टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करणारे तीन शेतमजूर आहेत· ५,५०१ रुपयांपेक्षा जास्त खर्च करणाऱ्यांच्या

बी·११ : घारदुरुस्ती, वाहन खर्च, व केस कापणे या इतर खर्चामध्ये नऊ (४०·९१ टक्के) शेतमजूर खर्च न करणारे आहेत· तसेच खर्च करणारेही बहुतेक जण वीस टक्केपेक्षा कमी खर्च करतात· वाहन खर्चामध्ये चाळीस टक्केपेक्षा जास्त खर्च करणारे अठरा (८१·८२ टक्के) तर केस कापण्यावर पंचवीस टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करणारा (५० टक्के) शेतमजूर करतात·

बी·१२ : सोन्याचांदीवरील खर्च शेतमजूर अभावानेच करताना आढळून येतात· बावीस भूहीन शेतमजुरांपैकी चांदीवर फक्त तीन (१३·६४ टक्के) शेतमजूर खर्च करतात·

४·२ सी :

सर्वेक्षणात असलेल्या पाच खंडकरी शेतमजुरांचा वरील अल्पभूधारक व भूहीन शेतमजुरांच्या खर्चाप्रमाणे प्रत्येक गटातील प्रत्येक वस्तूवर केल्या जाणा-या खर्चाचे प्रमाण आपण याठिकाणी पाहणार आहोत·

सी·१ : खंडकरी शेतमजुरांची खर्चाची पातळी जशी वाढत जाते· तसा जीवनावश्यक वस्तूंवरील खर्च वाढत जातो·आहे· परंतु धान्यावरील खर्चाची पातळी मात्र कमी होत जाते आहे· उदाहरणार्थ ५,५०० रुपयेपर्यंत खर्च गटात चाळीस टक्केपेक्षा जास्त खर्च धान्यावर केला जातो तर ७,००१ रुपयापेक्षा जास्त खर्च गटात धान्यावरील खर्चाचे प्रमाण चाळीस टक्क्यांपर्यंत आहे·

कडधान्यावर एकजण (२० टक्के) खर्च न करणारा आहे· कडधान्य, भाजीपाला, डाळी, यांच्या खर्चाचे प्रमाण तीन ते पाच टक्क्यां दरम्यानच आहे· दुधावरील खर्चाचे प्रमाण खर्चाच्या पातळीबरोबर वाढत जाते·

५,५०० रूपयेपर्यंत खर्च गटात दोन्ही शेतमजूर दुधावर ५ ते १० टक्के खर्च करतात. तर ७००१ रूपयांपेक्षा जास्त खर्च गटात दोन शेतमजूर दहा ते पंधरा टक्क्यांपर्यंत खर्च करतात. सर्व खांडकरी शेतमजूर वनस्पती तेलाचा वापर न करणारे आहेत. तेलावरील खर्च ७,००१ रूपयेपेक्षा जास्त खर्च गटात १५ टक्के पर्यंत तर ५,५०० रूपयापर्यंत खर्च गटात १५ टक्के पर्यंत व पंधरा टक्केपेक्षा जास्त खर्च प्रत्येकी एक (२० टक्के) शेतमजूर करतो.

मांस, मासे, अंडी या खर्चाची पहाणी केली असता असे दिसून येते की तीन (६० टक्के) शेतमजूर खर्च न करणारे आहेत. तर मांस व अंड्यावरील खर्चाचे प्रमाण जास्त असले तरी साठ टक्के शेतमजूर मांसावर, पाच टक्क्यापर्यंत खर्च करतात. तर सर्व शेतमजूर दोन टक्क्यांपर्यंतच खर्च करतात.

साखरेवरील खर्चाचे प्रमाण गुळावरील खर्चाच्या तुलनेने जास्त आहे. चार (८० टक्के) शेतमजूर गुळावर अर्धा टक्क्यांपेक्षा कमी खर्च करतात. तर चाळीस टक्के शेतमजूर पाच ते दहा टक्क्यांपर्यंत साखरेवर खर्च करतात. साठ टक्के शेतमजूर साखरेवर दहा टक्केपेक्षा जास्त खर्च करतात. चहावरील खर्चाचे प्रमाण बहुतेक सर्व शेतमजुरांचे दोन ते चार टक्क्यां दरम्यानच आहे. फळावर दोन (४० टक्के) शेतमजूर न खर्च करणारे तर तीन (६० टक्के) शेतमजूर दोन टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करतात. मसाल्यावर बहुतेक शेतमजूर सात ते दहा टक्क्यांदरम्यानच खर्च करतात.

सी.२ : इतर गरजांवरील खर्चामध्ये बिस्कीटांवर पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करणारे चार (८० टक्के) शेतमजूर आहेत. स्टोव्ह,घड्याळावर व सायकलवर पंधरा टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करणारे प्रत्येकी एक जण (२० टक्के) आहे.

सी.३ : सर्व खांडकरी शेतमजूर व्यसनग्रस्त आहेत. पानतंबाखू, दारु व जुगार यांचे प्रमाण जास्त आहे. दारुच्या व्यसनावर पंचवीस ते पन्नास टक्क्यांपर्यंत

खर्च करणारे शेतमजूर तीन (६० टक्के) तर पानतंबाखूवर पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त खर्च एक (२० टक्के) शेतमजूर करतो.

सी.४ : इंधनामध्ये प्रामुख्याने रॉकेलवर खर्च सर्वजण करतात. रॉकेलवर साठ टक्क्यांपेक्षा जास्त खर्च दोन (४० टक्के) शेतमजूर करतात. लाकडे (सरपण) व वीजेचा वापर न करणारे तीन (६० टक्के) शेतमूर तर यावर अनुक्रमे दोन (४० टक्के) व एक (२० टक्के) शेतमूजूर पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करणारे आहेत. शेणीचा वापर विकत घेवून कोणीही करत नाहीच असे दिसून येते.

सी.५ : खांडकरी शेतमजुरांच्या कपड्यावरील खर्चाची पहाणी केल्यास असे दिसून येते की मुलींच्या कपड्यावरील खर्चाचे प्रमाण जास्त (२५ ते ४० टक्क्यांपर्यंत) खर्च तीन मुलांच्या कपड्यावर केला जातो. पुरुषांच्या कपड्यावरील खर्चाचे प्रमाण पंधरा टक्क्यांपर्यंत आहे. मुले व स्त्रीयांच्या कपड्यावरील खर्चामध्ये चाळीस टक्क्यांपेक्षा जास्त खर्चामध्ये प्रत्येकी एकाचा (२० टक्के) समावेश आहे.

सी.६ : मनोरंजनावरील होणा-या एकूण खर्चात खांडकरी शेतमजुरांपैकी चार (८० टक्के) शेतमजूर पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त खर्च यात्रेवर करतात. यातील तीन (६० टक्के) शेतमजूर ७५ टक्क्यापेक्षा जास्त खर्च यात्रेवर करतात. करमणुकीवर दोन (४० टक्के) शेतमजूर खर्च करत नाहीत. तर दोन (२० टक्के) शेतमजूर वीस टक्क्यापेक्षा जास्त खर्च करतात. तसेच खेळ साहित्य, पेपर, रेडिओ खरेदीवर गतवर्षी कोणीही खर्च केलेला नाही.

सी.७ : प्रसाधनावरील केल्या जाणा-या खर्चापैकी जास्त खर्च हा कपड्यांच्या साबणावर करणा-यांचे प्रमाण अधिक आहे. तीन (६० टक्के) शेतमजूर दहा ते वीस टक्क्यापर्यंत अंगाच्या साबणावर खर्च करतात. तर चार (८० टक्के)

....१०९/-

सी.११ : घरदुरुस्ती, वाहन खर्च, व केस कापणे यामध्ये तीन (६० टक्के) शेतमजूर घरदुरुस्तीवर खर्च न करणारे तर दोन (४० टक्के) शेतमजूर वीस टक्क्यापर्यंत खर्च करतात. वाहन खर्चामध्ये साठ टक्क्यापेक्षा जास्त खर्च चार (८० टक्के) शेतमजूर करतात. बहुतेक शेतमजूर केस कापण्यावर पंचवीस ते साठ टक्क्यांपर्यंत खर्च करतात.

सी.१२ : सोन्याचांदीच्या दागिन्यावरील खर्चाचा विचार केल्यास यावर खर्च करणारे अभावानेच आढळतात. यामधील तीन (६० टक्के) शेतमजूर खर्च न करणारे तर प्रत्येकी एक (२० टक्के) शेतमजूर सोने व चांदीवर खर्च करतात.

या सर्वेक्षणात विचारात घेतलेल्या १२० शेतमजुरांच्या एकूण खर्चापैकी ५५ टक्के भाग जीवनावश्यक वस्तूंवर खर्च होतो. त्यात वाढत्या अल्पन्नाच्या दृष्टीने धान्यावरील खर्चाचे प्रमाण कमी वेगाने वाढत जाते. डाळी, कडधान्ये, दूध यावर खर्च फारच कमी होतो. म्हणजे शेतमजुरांना प्रथीने पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत. परंतु ८९ टक्के शेतमजुरांना व्यसने आहेत. पानतंबाखू व दारु ही मुख्य व्यसने आहेत. इंधनावरील खर्च अल्प आहे. कपड्यावर एकूण खर्चाच्या सर्वसाधारणपणे पंधरा ते वीस टक्के खर्च होतो. कपड्यावरील खर्चात स्त्रीया व मुलींच्या कपड्यावरील खर्चाचे प्रमाण जास्त आहे. पादत्राणावरील खर्च दोन टक्के इतकाच आहे. वैद्यकीय सेवेवर दोन टक्के इतकाच खर्च होतो. मनोरंजनावरील खर्चात यात्रेवरील खर्च प्रमुख आहे. वैद्यकीय व तत्सम बाबींवर होणा-या खर्चाच्या मानाने प्रसाधनावरील खर्च तुलनात्मक दृष्टया जास्त आहे. मात्र त्यात अंगाचा व कपड्याचा साबण यावरील खर्चाचेच प्रमाण जास्त आहे. जवळजवळ एक तृतीयांश शिक्षणावर अजिबात खर्च करीत नाहीत. यावरुन शेतमजुरांच्या जीवनातील शिक्षणाच्या स्थानाची कल्पना येते. शिक्षणावर होणारा खर्च पुस्तके व वहया यावरच होतो. ॲल्युमिनियम व तांब्याची भांडी शेतमजूर पसंत करतात. त्यांच्यात प्लॅस्टिक अजून लोकप्रिय झालेले नाही. सोन्या-चांदीच्या दागिन्यावर खर्च करणारे अभावानेच आढळतात.

प्रकरण - पाचवे

शेतमजुरांनी घेतलेली कर्जे व शेतमजुरांची बचत

शेतकरी कर्जबाजारी असतो हा जगभरचा नियम आहे. शेतकरी कर्जात जन्मतो. तो कर्जात जगतो व कर्जातच मरण पावतो. दर पिढीला कर्जाचे हे ओझे वाढत जाते, व वाढते ओझे वागवीत तो जगत असतो. या वैश्विक नियमाला शेतमजुर आणि विशेषात: भारतीय शेतमजूर कसा अपवाद असू शकेल ? कामेरी गावातील शेतमजुरांची पहाणी करताना त्यांनी घेतलेल्या कर्जाचीही माहिती गोळा केली आहे. ही आकडेवारी विविध दृष्टीकोनातून मांडून त्यांचे विश्लेषण या प्रकरणातील पहिल्या भागात केले आहे.

कामेरी गावातील सर्वेक्षण केलेल्या १२० शेतमजुरांपैकी २८ जणांनी कर्जे घेतलेली नाहीत. उरलेल्या ९२ शेतमजुरांनी १५१ कर्जे विविध मार्गांनी घेतली आहेत. म्हणजे प्रत्येक घरटी १.६४ टक्के असे कर्ज प्रमाण पडते.

: भाग पहिला :

शेतमजुरांनी घेतलेल्या कर्जाचे विवेचन प्रथमत: त्यांच्या उत्पन्नाप्रमाणे केलेले आहे. अल्पभूधारक शेतमजुरांनी विविध मार्गांनी घेतलेल्या कर्जाची उत्पन्नानुसार आकडेवारी तक्ता ५.१ मध्ये मांडलेली आहे. या ९३ शेतमजुरांपैकी चोवीस (२५.८१ टक्के) शेतमजूर कर्ज न घेणारे आहेत. २९ (३१.१८ टक्के) जणांनी बँकेकडून, चौतीस (३६.५६ टक्के) शेतमजुरांनी सावकाराकडून, ३३ (३५.३८ टक्के) कुटुंबांनी मित्रांकडून व सतरा (१८.२८ टक्के) व्यक्तिंनी नातेवाईकांकडून कर्जे घेतलेली आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, अनेकजणांनीएकापेक्षा जास्त मार्गांनी कर्ज उभे केले आहे. शिवाय छत्तीस टक्के शेतमजूर आजही सावकाराकडून कर्जे घेत असतात.

दरसाल ४,५०० रुपयापर्यंत उत्पन्न असणाऱ्यांचा एक गट केला असता बँकाकडून कर्ज घेणारे सर्वात कमी असून सावकारांकडून कर्ज घेणारे जास्त आहेत. मित्र व नातेवाईकांचा सहारा मोठा आहे. ४,५०१ ते ६,००० या उत्पन्न गटातील शेतमजूर सावकारांच्या विळख्यात मोठ्या प्रमाणात गुंतलेले दिसतात. तर बँक व मित्र हे जवळजवळ सारख्याच तोलाचे मार्ग आहेत. नातेवाईक कमी महत्वाचे ठरले आहेत. ६,००१ पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या गटात कर्जाचा मार्ग म्हणून बँकांचे महत्व वाढले असले तरी सावकारांचे महत्व फारसे कमी झालेले नाही.

... ११५/-

एकूण बावीस भूहीन शेतमजुरात कर्ज न घेणारे फक्त तीन (१३·६४ टक्के) जण आहेत· बँकांकडून आठ (३६·३७ टक्के) जणांनी तर सावकारांकडून दहा (४५·४५ टक्के) शेतमजुरांनी, मित्रांकडून नऊ (४०·९१ टक्के) व नातेवाईकांकडून चौघांनी (१८·१९ टक्के) कर्जे घेतलेली आहेत· (तक्ता ५·२)

वार्षिक उत्पन्न ४,५०० पर्यंत असणा-यात, मित्रांकडून कर्ज घेणारे जास्त असले तरी बँकाइतकेच सावकारांचे वर्चस्व आहे· दरसाल ४,५०१ ते ६,००० रुपये उत्पन्न सावकार, हा कर्जाचा मार्ग म्हणून मित्र व नातेवाईकांस्वढाच महत्वाचा असला तरी बँकांपेक्षा सावकारांचे स्थान भक्कम दिसते· ६,००१ रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असणा-या भूहीन शेतमजुरांच्या बाबतीत हीच परिस्थिती जाणवते की, बँका शेतमजुरांना सावकारी पाशातून सोडवू शकल्या नाहीत·

सर्वेक्षणात समाविष्ट केलेल्या पाच खंडकरी शेतमजुरांपैकी एकजण कर्जात गुंतलेला नाही· दोघांनी बँकांकडून, तिघांनी सावकारांकडून व प्रत्येकी एकाने मित्राकडून व नातेवाईकांकडून कर्जे घेतलेली आहेत· (तक्ता ५·३)

सर्व १२० शेतमजूरांचा विचार करता असे दिसून येते की, अठ्ठावीस (२३·३३ टक्के) जण कर्जबाजारी नाहीत· ३९ (३२·५० टक्के) लोकांनी बँकांकडून सत्तेचाळीस (३९·८३ टक्के) शेतमजुरांनी मित्रांकडून व बावीस)१८·३३ टक्के) जणांनी नातेवाईकांकडून कर्जे घेतली आहेत· यावरून आजही ग्रामीण भागात सावकारांचे पतपुरवठयातील महत्वाचे स्थान स्पष्ट होते·

कर्जाची मुदत

अल्पभूधारकांनी घेतलेल्या कर्जात पाच कर्जे एक वर्षापर्यंतच्या मुदतीची, वीस जणांनी घेतलेली कर्जे एक ते तीन वर्ष व चार जणांची कर्जे तीन ते पाच वर्ष मुदतीची आहेत. सावकारांची बहुतेक कर्जे बिनमुदतीची तर मित्र व नातेवाईकांची सर्व कर्जे बिनमुदतीची आहेत. (तक्ता ५.४)

भूहीन शेतमजुरांची बँकांची सर्व कर्जे एक ते तीन वर्ष मुदतीची तर सावकार, मित्र व नातेवाईकांकडून घेतलेली सर्व कर्जे बिनमुदतीची आहेत. (तक्ता ५.५) तसेच खंडकरी शेतमजुरांनी बँकांकडून घेतलेली सर्व कर्जे एक ते तीन वर्ष मुदतीची तर सावकार मित्र व नातेवाईकांक डून घेतलेली सर्व कर्जे बिनमुदतीची आहेत. (तक्ता ५.६)

सर्व शेतमजुरांनी घेतलेल्या कर्जात बिनमुदत कर्जाचे प्रमाण ७१.५२ टक्के आहे. बिनमुदत कर्जे शेतमजुरांच्या उत्पन्नातील अशाश्वती व त्यांची कर्जपरतफेडीची असमर्थता दर्शवितात. हे प्रमाण शेतमजुरांच्या आर्थिक अगतिकतेचे द्योतक आहे. बँकांकडून घेतलेली बहुतेक कर्जे एक ते तीन वर्ष मुदतीची आहेत व त्यांचे एकूण कर्ज संख्येशी असलेले प्रमाण १९.८६ टक्के आहे.

कर्जावरील व्याजाचा दर

शेतमजुरांच्या दृष्टीने कर्जावरील व्याजाचा दर महत्वाचा असतो. कारण त्यावरुन कर्ज थकबाकीचे प्रमाण ठरत असते. जास्त व्याजदराची कर्जे थकतात. मित्र व नातेवाईकांकडून घेतलेली बहुतेक कर्जे बिनव्याजी आहेत. म्हणजे ती कर्जापेक्षा उसनवार आहे. विशेष म्हणजे सावकारांकडून सुद्धा काही प्रमाणात बिनव्याजी कर्जे मिळते.

... १२३/-

अल्पभूधारकांनी बँकाकडून घेतलेल्या कर्जापैकी ३४·४८ टक्के कर्जे तीन ते पाच टक्के व्याजदराची तर ६५·५२ टक्के कर्जे पाच ते पंधरा टक्के व्याजदराची आहेत· सावकारांकडून घेतलेल्या कर्जापैकी ११·५६ टक्के कर्जे बिनव्याजी ६·६७ टक्के कर्जे तीन टक्क्यापर्यंतच्या व्याजदराची, १४·७१ टक्के कर्जे पाच ते पंधरा टक्के व्याजदराची, २६·४७ टक्के कर्जे पंधरा ते साठ टक्के व्याजदराची आहेत· ८·८२ टक्के साठ ते ऐंशी टक्के व्याजदराची तर ३५·२९ टक्के कर्जे दरसाल ८४ टक्क्यांपेक्षा जास्त व्याजदराची आहेत· (तक्ता ५·४)

भूहीन शेतमजुरांनी बँकाकडून घेतलेल्या कर्जापैकी ७५ टक्के कर्जे तीन ते पाच टक्के व्याजदराची आहेत· तर सावकाराकडून दहा पैकी पाच कर्जावर पंधरा ते साठ टक्के व तीन कर्जावर साठ टक्क्यांपेक्षा जास्त व्याजाचा दर होता· मित्रांकडून घेतलेली बहुतेक व नातेवाईकांकडून घेतलेली सर्व कर्जे बिनव्याजी होती· (तक्ता ५·५)

खंडकरी शेतमजुरांनी बँकाकडून घेतलेली कर्जे तीन ते पंधरा टक्के व्याजदराची आहेत· सावकारांकडून घेतलेल्या तीन कर्जापैकी एक कर्ज बिनव्याजी तर दोन कर्जे साठ टक्क्यांपेक्षा जास्त व्याजदर धारण करणारी आहेत· मित्र व नातेवाईकांकडील कर्जे बिनव्याजी आहेत· (तक्ता ५·६)

या सर्व शेतमजुरांनी सावकारांकडून घेतलेल्या सत्तेचाळीस कर्जापैकी चार कर्जे बिनव्याजी आहेत· दोन कर्जे तीन ते पाच टक्के व्याजदराची तर सात कर्जे पंधरा टक्केपर्यंत व्याजदराची आणि चौदा कर्जे पंधरा ते साठ टक्के व्याज असणारी आहेत· विशेष म्हणजे वीस कर्जे साठ टक्क्यांपेक्षा जास्त व्याजदराची आहेत· मित्रांकडून घेतलेल्या त्रेचाळीस कर्जापैकी चाळीस कर्जे बिनव्याजी व नातेवाईकांकडून घेतलेली सर्व कर्जे बिनव्याजी आहेत· म्हणजे सावकारांकडून मुदत व व्याजदर या दोन्ही बाबतीत ऋणकोंचे शोषण होताना दिसते·

कर्जाची रक्कम

शेतमजुरांनी घेतलेल्या कर्जाच्या रकमेचे विश्लेषण शेतजमिनीचे आकारमान, शैक्षणिक पातळी, वार्षिक उत्पन्न व कुटुंबाचे आकारमान या चार घटकांच्या आधारे केलेले आहे.

शेतमजुरांनी विविध मार्गांनी घेतलेल्या कर्जाची रक्कम साधारणपणे ५००० रुपयांपेक्षा जास्त नाही. त्यात बँकाकडून ५००० रुपयापर्यंतची कर्जे घेतलेली आढळतात. सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची मर्यादा ३,००० रुपयापर्यंत आहे. मित्र व नातेवाईकांकडून केलेल्या उचलीची मर्यादा अपवाद वगळता १,००० रुपयांपेक्षा जास्त नाही.

शेतमजुरांनी घेतलेल्या कर्जाची रक्कम

५.अे.० : शेतमजुरांच्या वार्षिक उत्पन्नावरून त्यांच्या कर्जाच्या रकमांचे पृथ:करण पुढीलप्रमाणे करता येईल.

५.अे.१ : अल्पभूधारक :-

शेतमजुरांच्या उत्पन्नावरून त्यांच्या कर्जाच्या रकमांची पहाणी करत असता असे दिसून येते की अल्पभूधारक शेतमजुरांमध्ये कर्जाशी संबंधीत ११३ कर्जांचे पुढीलप्रमाणे उत्पन्न गटात वर्गीकरण करता येईल.

१.१ : ३,००० ते ४,५०० रुपये गट :-

या उत्पन्न गटामध्ये येणारी वीस (१७.७० टक्के) कर्जे आहेत. यामध्ये दोन (१० टक्के) शेतमजूर बँकेकडून ३,००० रुपयेपर्यंत कर्जे घेतात.

चार (२० टक्के) शेतमजूर सावकारांकडून ३,००० रुपयेपर्यंत कर्ज घेतात. सहा (३० टक्के) शेतमजूर मित्रांकडून कर्ज घेतात, यापैकी चार (६६.६७ टक्के) शेतमजूर १,००० रुपयेपर्यंत तर दोन (३३.३३ टक्के) शेतमजूर १,००० ते ३,००० रुपये पर्यंत कर्ज घेतात. तर नातेवाईकांकडून कर्ज घेणाऱ्या सात (३५ टक्के) शेतमजुरांपैकी दोन (२८.५७ टक्के) ५०० रुपये पर्यंत, दोन (२८.५७ टक्के) ५०१ ते १,००० पर्यंत तर तीन (४२.८६ टक्के) शेतमजूर १,००१ रुपयेपेक्षा जास्त कर्ज घेतात.

१.२ : <u>४,५०१ ते ६,००० रुपये गट</u> :-

या उत्पन्न गटामध्ये त्रेपन्न (४६.९० टक्के) कर्जांचा समावेश होतो. या गटामध्ये बँकेकडून कर्ज घेणाऱ्या शेतमजुरांची संख्या चौदा (१६.४२ टक्के) आहे. यामधील बारा (८५.७१ टक्के) शेतमजूर ३,००० रुपये पर्यंत तर दोन (१४.२९ टक्के) शेतमजूर ३,००१ रुपयापेक्षा जास्त कर्ज घेतात: या गटामध्ये आठरा)३३.९६ टक्के) शेतमजूर सावकारांकडून कर्ज घेतात. पैकी चार (२२.२२ टक्के) शेतमजूर ५०० रुपयांपेक्षा कमी, आठ (४४.४४ टक्के) शेतमजूर ५०१ ते १,००० रुपये व सहा (३३.३३ टक्के) शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपयेपर्यंतची कर्ज घेतात. पंधरा (२८.३० टक्के) शेतमजूर मित्रांच्याकडून कर्ज घेतात. पैकी तीन (२० टक्के) शेतमजूर ५०० रुपयेपर्यंत तर प्रत्येकी सहा (४० टक्के) शेतमजूर ५०१ ते १,००० रुपये व १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात. सहा (११.३२ टक्के) शेतमजूर नातेवाईकांकडून कर्ज घेतात पैकी चार (६६.६७ टक्के) शेतमजूर ५०१ ते १,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात.

१.३ : <u>६,००१ रुपये ते ९,००० रुपयांपेक्षा जास्त</u> :-

या उत्पन्न गटात येणारे चाळीस (३५.४० टक्के) कर्ज आहेत. या शेतमजुरांपैकी तेरा (३२.५ टक्के) जण बँकेकडून कर्ज घेतात. यामध्ये १,०००

रुपयेपेक्षा कमी कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण अत्यंत कमी ७.७० टक्के आहे. तर आठ (६१.५४ टक्के) शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात. आकरा (२७.५ टक्के) जण सावकारांकडून कर्ज घेतात. यापैकी दोन (१८.१८ टक्के) ५०० रुपयांपेक्षा कमी तर तेवढेच ५०१ ते १,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात. बारा (३० टक्के) शेतमजूर मित्रांकडून कर्ज घेतात यांच्यामध्येही प्रत्येकी दोन (८.३३ टक्के) शेतमजूर ५०० रुपयांपर्यंत व ५०१ ते १,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात. या उत्पन्न गटात चार (१० टक्के) शेतमजूर नातेवाईकांकडून कर्ज घेतात.

थोडक्यात अल्पभूधारक शेतमजुरांमध्ये कर्जाचे प्रमाण हे जसे उत्पन्न वाढत जाते तसे वाढत जाते. म्हणजे ४,५०१ ते ६,००० रुपये उत्पन्न गटात कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. त्याविरुध्द ६,००१ रुपयांनंतर जसे उत्पन्न वाढत जाते तसे कर्जाचे प्रमाण कमी कमी होत जाते.

५.अ.२ :

भूहीन शेतमजुरांच्या कर्जाच्या रकमांचे पृथ्थकरण त्यांच्या उत्पन्न गटाच्या संदर्भात केले असता पुढील निष्कर्ष निघातात.

२.१ : ३,५०१ ते ४.५०० रुपये उत्पन्न गटात आठ (२५.८१ टक्के) शेतमजुरांचा समावेश होतो. यांच्यापैकी दोन (२५ टक्के) शेतमजूर बँकेकडून कर्ज घेतात. यामधील एक (५० टक्के) शेतमजूर १,००० रुपयांपर्यंत तर दुसरा (५० टक्के) १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात. भूहीन शेतमजुरांच्या गटातील दोन (२५ टक्के) शेतमजूर सावकाराकडून १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात. उरलेले चार (५० टक्के) भूहीन शेतमजूर मित्राकडून कर्ज घेतात. यांच्यापैकी दोन (५० टक्के) शेतमजूर १,००० रुपयांपर्यंत तर दोन (५० टक्के) शेतमजूर १,००१ रुपयापेक्षा जास्त कर्ज घेतात.

२·२ :

४,५०१ ते ६,००० रुपयांपर्यंतच्या उत्पन्न गटात कर्ज घेणा-या पंधरा शेतमजुरांचा समावेश होतो· या पंधरा (४८·३९ टक्के) शेतमजुरांपैकी आठ (५३·३३ टक्के) शेतमजूर ५०० रुपयांपर्यंत कर्ज घेतात· तर चार (२६·६७ टक्के) शेतमजूर १,००१ रुपयांपेक्षा जास्त कर्ज घेतात· तर तीन (२० टक्के) शेतमजूर १,००० रुपयांपर्यंतची कर्जे घेतात·

२·३ :

६,००१ ते ९,००० रुपयांपर्यंतच्या उत्पन्न गटातील आठ (२५·८१ टक्के) कर्ज घेणा-या शेतमजुरांपैकी चार (५० टक्के) शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात· तर तीन (३७·५ टक्के) शेतमजूर ५०१ ते १,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात व एक (१२·५ टक्के) शेतमजूर ३,००१ ते ५,००० रुपयापर्यंत कर्ज घेतात·

५·अे·३ :

खांडकरी शेतमजुरांच्या कर्जाच्या रक्कमांचे विश्लेषण त्यांच्या उत्पन्न संबंधात केले असता पुढीलप्रमाणे परिस्थिती दिसून येते·

३·१ :

५,००१ ते ६,००० रुपयांपर्यंतच्या उत्पन्न गटात येणा-या तीन (४२·८६ टक्के) कर्ज घेणा-या शेतमजुरांपैकी दोन (६६·६७ टक्के) शेतमजूर ५०० रुपया - पर्यंत कर्ज घेतात· तर एक (३३·३३ टक्के) शेतमजूर ५०१ ते १,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात·

३·२ :

७,००१ ते ९,००० रुपयांपर्यंत उत्पन्न गटातील कर्ज घेणा-या चार (५७·१४ टक्के) शेतमजुरांपैकी दोन (५० टक्के) शेतमजूर १,००० रुपयांपर्यंत तर दोन (५० टक्के)शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपयां दरम्यान कर्ज घेतात·

३·३ : सर्व अल्पभूधारक,भूहीन व खंडकरी शेतमजुरांच्या उत्पन्नावरुन त्यांच्या कर्जाचे सर्वेक्षण केले असता असे दिसून येते की जसजशी उत्पन्न पातळी वाढत जाते तसतसे कर्ज घेण्या-यांचे व कर्जाच्या रक्कमांचे प्रमाण वाढत जाते· व एका ठराविक (६,५०१ ते ७,००० रुपये) उत्पन्न पातळी नंतर कर्ज घेणा-यांचे व कर्जाच्या रक्कमांचे प्रमाण कमी होत जाते·

५·बी·७ :

शेतमजुरांच्या शैक्षणिक पातळीवरुन कर्जाच्या रक्कमांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येईल·

बी·१·० : अल्पभूधारक शेतमजुरांच्या शैक्षणिक पातळीचे (१) अशिक्षित (२) प्राथमिक (३) माध्यमिक व उच्चमाध्यमिक असे तीन गट पाडून त्यांच्या कर्जाच्या रक्कमांचे पृथ्थकरण करता येईल· या ९३ शेतमजूरांनी ११३ कर्जे घेतली आहेत·

बी·१·१ : अशिक्षित अल्पभूधारक शेतमजुरांमध्ये ४६ (४०·७१ टक्के) कर्जे आहेत· यापैकी दहा (२१·७४ टक्के) शेतमजूर बँकेकडून कर्जे घेतात· सतरा (३६·९६ टक्के) शेतमजूर सावकारांकडून, तेरा (२८·२६ टक्के) मित्रांकडून तर सहा (१३·०४ टक्के) शेतमजूर नातेवाईकांकडून कर्जे घेतात· वरील कर्जे घेणा-यापैकी तेवीस (५० टक्के) शेतमजूर १,००० रुपयापर्यंत कर्जे घेतात· एकोनीस (४१·३० टक्के) शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपयापर्यंत तर चार (८·७० टक्के) शेतमजूर ३,००१ रुपयांपेक्षा जास्त रक्कमेची कर्जे घेतात·

बी·१·२ : प्राथमिक शिक्षण असलेल्या शेतमजुरांच्या गटातील ५६ (४९·५६ टक्के) कर्जे घेणा-या शेतमजुरामधील सतरा (३०·३६ टक्के) शेतमजूर बँकेकडून

कर्ज घेतात. बारा (२१.४३ टक्के) सावकारांकडून, आठरा (३२.१४ टक्के) मित्रांकडून तर नऊ (१६.०४ टक्के) शेतमजूर नातेवाईकांकडून कर्ज घेतात. या गटातील कर्ज घेणा-या शेतमजुरांपैकी सव्वीस (४६.४३ टक्के) शेतमजूर १,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात. २८ (५० टक्के) शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंत तर दोन (३.५७ टक्के) शेतमजूर ३,००१ रुपयांपेक्षा जास्त कर्ज घेतात.

बी.१.३ :

माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षित शेतमजूर या गटात कर्ज घेणा-या अकरा (९.७३ टक्के) शेतमजुरांपैकी दोन (१८.१८ टक्के) बँकेकडून, पाच (४५.४६ टक्के) सावकारांकडून, दोन (१८.१८ टक्के) मित्रांकडून तर तेवढेच शेतमजूर नातेवाईकांकडून कर्ज घेतात. या सर्व शेतमजुरांपैकी पाच (४५.४६ टक्के) शेतमजूर १,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात. तेवढेच शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंतची कर्ज घेतात. तर एक (९.०९ टक्के) शेतमजूर सावकारांकडून ३,००१ रुपयांपेक्षा जास्त कर्ज घेतात.

बी.२.० :

भूहीन शेतमजुरांच्या कर्जाच्या रक्कमांचे विश्लेषण शेतमजुरांच्या शिक्षणपातळीनुसार पुढीलप्रमाणे मांडता येते. भूहीन शेतमजुरांची एकतीस कर्ज आहेत.

बी.२.१ :

अशिक्षित या गटामध्ये कर्ज घेणा-या अकरा (३५.४८ टक्के) शेतमजुरांपैकी पाच (४५.४६ टक्के) शेतमजूर बँकेकडून चार (३६.३६ टक्के) शेतमजूर सावकारांकडून तर प्रत्येकी एक (९.०९ टक्के) शेतमजूर मित्र व नातेवाईकांकडून कर्ज घेतात. या सर्व शेतमजुरांमधील चार (३६.३६ टक्के) शेतमजूर १,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात. सहा (५४.५५ टक्के) शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंत तर एक (९.०९ टक्के) शेतमजूर ३,००१ रुपयांपेक्षा जास्त कर्ज बँकेकडून घेतात.

....१३०/-

बी·२·२ : प्राथमिक शिक्षित :-

या गटातील वीस (२४·५२ टक्के) कर्जापैकी तीन १५ टक्के) शेतमजूर बँकाकडून, सहा (३० टक्के) शेतमजूर सावकारांकडून, आठ (४० टक्के) शेतमजूर मित्रांकडून तर तीन (१५ टक्के) शेतमजूर नातेवाईकांकडून कर्ज घेतात· या सर्व शेतमजुरांपैकी तेरा (६५ टक्के) शेतमजूर १,००० रुपयापर्यंत, सात (४० टक्के) शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात·

सी·३·० :

खांडकरी शेतमजुरांमधील कर्ज घेणा-या सात शेतमजुरांचे पृथ्थकरण त्यांच्या शैक्षणिक पातळी गटाशी पुढीलप्रमाणे करता येते·

सी·३·१ : अशिक्षित :-

खांडकरी शेतमजुरांनी तीन (४२·८६ टक्के) कर्ज घेतली ती १,००० रुपयांपेक्षा कमी आहेत· यात सावकारांकडून घेणारे दोन (६६·६७ टक्के) व बँकेकडून कर्ज घेणारे एक (३३·३३ टक्के) आहेत·

सी·३·२ : प्राथमिक :-

शैक्षणिक गटातील चार (५७·१४ टक्के) कर्ज घेणा-या शेतमजुरांपैकी ५०० रुपयांपर्यंत कर्ज घेणारे प्रत्येकी एक (२५ टक्के) शेतमजूर सावकार व मित्र यांच्याकडून कर्ज घेतात· तर १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंत बँक व नातेवाईक यांच्याकडून प्रत्येकी एक (२५ टक्के) शेतमजूर कर्ज घेतात·

५·डी·० : शेतमजुरांच्या कर्जाच्या रक्कमांचे पृथ्थकरण शेतमजुरांच्या जमीनीच्या आकारमानावरून पुढीलप्रमाणे करता येईल· यासाठी शेतमजुरांच्या

जमीनीचे (१) एक ते तीस आर (२) एकतीस ते साठ आर व (३) ६१ आर पेक्षा जास्त असे गट पाडून ते पृथ्थकरण पुढीलप्रमाणे मांडता येईल.

५.डी.१ :

अल्पभूधारक शेतमजुरांनी घेतलेल्या ११३ रक्कमांचे विश्लेषण त्यांच्या जमीनीच्या आकारमानावरुन पुढीलप्रमाणे मांडता येईल.

डी.१.१ : एक ते तीस आर :-

एक ते तीस आर या जमीन गटाशी संबंधीत कर्ज घेणा-या शेतमजुरांचे प्रमाण एकूण ११३ कर्जापैकी ६५ (५७.५२ टक्के) आहे. या शेतमजुरांपैकी वीस (३०.७७ टक्के) शेतमजूर बँकांकडून, सोळा (२४.६२ टक्के) सावकारांकडून, तेवढेच शेतमजूर मित्रांकडून तर तेरा (२० टक्के) शेतमजूर नातेवाईकांकडून कर्ज घेतात. या सर्व शेतमजुरांपैकी अठ्ठावीस (४३.०८ टक्के) शेतमजूर १,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात. बत्तीस (४९.२३ टक्के) शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात. तर पाच (७.६९ टक्के) शेतमजूर ३,००१ रुपयांपेक्षा जास्त रक्कमांची कर्ज घेतात.

डी.१.२ : ३१ ते ६० आर :-

या जमीन गटातील शेतमजुरांनी घेतलेल्या ४१ (३६.२८ टक्के) कर्जापैकी आठ (१९.५१ टक्के) शेतमजूर बँकेकडून कर्ज घेतात. पंधरा (३६.५९ टक्के) शेतमजूर सावकारांकडून, चौदा (३४.१४ टक्के) मित्रांकडून तर चार (९.७६ टक्के) शेतमजूर नातेवाईकांकडून कर्ज घेतात. या सर्व शेतमजुरांपैकी तेवीस (५६.१० टक्के) शेतमजूर १,००० रुपयांपर्यंत, सोळा (३९.०२ टक्के) शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंत तर दोन (४.८८ टक्के) शेतमजूर ३,००१ रुपयांपेक्षा जास्त रक्कमांची कर्ज घेतात.

डी·१·३ : ६१ आर ते २ हेक्टर :-

या जमीन गटाशी संबंधीत सात (१७·०३ टक्के) कर्जामधील एक (१४·२९ टक्के) शेतमजूर बँकेकडून तर सावकार व मित्र यांच्याकडून प्रत्येकी तीन (४२·८६ टक्के) शेतमजूर कर्ज घेतात· या सर्व शेतमजुरांपैकी तीन (४२·८६ टक्के) शेतमजूर १,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात· तर चार (५७·१४ टक्के) शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात·

५·इ·० :

भूहीन शेतमजुरांजवळ जमीन नसल्यामुळे जमीनीच्या आकारमाना - प्रमाणे त्यांच्या कर्जाचे विवेचन केलेले नाही· खंडकरी शेतमजुरांनी घेतलेल्या सात कर्जाच्या रक्कमांचे पृथःकरण त्यांच्या जमीनीच्या आकारमानाच्या संदर्भात पुढीलप्रमाणे करता येईल·

इ·१·१ : अकरा ते वीस आर :-

अकरा ते वीस आर या जमीन आकारमानाच्या संदर्भात दोन कर्ज (२८·५७ टक्के) ५०० रुपयांपेक्षा कमी कर्ज असून ती सावकार व मित्र यांच्याकडून घेतलेली आहेत·

इ·१·२ : ४१ ते ५० आर :-

या जमीन गटात एकट्याने १,००० रुपयांपर्यंत सावकारांकडून कर्ज घेतले आहे·

····१३३/-

इ·१·३ : ८० आर ते दोन हेक्टर :-

या जमीन गटाशी संबंधीत चार (५७·१४ टक्के) कर्जापैकी दोन (५० टक्के) शेतमजुरांना बँकेकडून, प्रत्येकी एका (२५ टक्के) शेतमजुराला सावकारांकडून व मित्राकडून कर्ज घ्यावी लागतात· या चार शेतमजुरांपैकी दोन (५० टक्के) शेतमजुरांना १,००० रुपयांपर्यंत तर दोन (५० टक्के) शेतमजुरांना १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंत कर्ज घ्यावी लागतात·

५·एफ·० :

कुटुंबाच्या आकारमानासंदर्भात शेतमजुरांच्या कर्जाच्या रक्कमांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते·

५·एफ·१ :

अल्पभूधारक शेतमजुरांच्या कर्जाच्या रक्कमांचे विश्लेषण त्यांच्या कुटुंबाच्या आकारमाना संदर्भात मांडण्यासाठी शेतमजुरांच्या कुटुंबाचे (१) एक ते तीन व्यक्ती (२) चार ते पाच व्यक्ती· व (३) सहा व सहापेक्षा जास्त व्यक्ती अशा तीन गटामध्ये कुटुंबाचे वर्गीकरण केले आहे·

एफ·१·१ : एक ते तीन व्यक्ती :-

एक ते तीन व्यक्ती असणाऱ्या कुटुंबाच्या आकारमानाशी संबंधीत सतरा कर्ज घेणाऱ्या (१५·०४ टक्के) शेतमजुरांमधील सहा (३५·२९ टक्के) शेतमजूर बँकांकडून, चार (२३·५३ टक्के) सावकारांकडून, पाच (२९·४१ टक्के) मित्रांकडून तर दोन (११·७६ टक्के) नातेवाईकांकडून कर्ज घेतात· या कर्ज

घेणा-या शेतमजुरांपैकी दहा (५८·८२ टक्के) शेतमजूर १,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात. तर सात (४१·१८ टक्के) शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंतच्या रक्कमांची कर्जे घेतात.

एफ·१·२ : चार व पाच व्यक्ती :-

चार व पाच व्यक्ती असणा-या कुटुंबामध्ये ७२ (६३·७२ टक्के) कर्जे घेतली आहेत. त्यापैकी सतरा (२३·६१ टक्के) शेतमजूर बँकांकडून कर्जे घेतात. चोवीस (३३·३३ टक्के) शेतमजूर सावकारांकडून, वीस (२७·७८ टक्के) मित्रांकडून तर आकरा (१५·२८ टक्के) शेतमजूर नातेवाईकाकडून कर्जे घेतात. कर्जे घेणा-या या सर्व शेतमजुरांपैकी एकतीस (४३·०६ टक्के) शेतमजूर, १,००० रुपयांपर्यंतच्या रक्कमेची कर्जे घेतात. छत्तीस (५० टक्के) शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंतच्या रक्कमेची कर्जे घेतात. तर पाच (६·९४ टक्के) शेतमजूर ३,००१ रुपयांपेक्षा जास्त रक्कमांची कर्जे घेतात.

एफ·१·३ : सहा व त्यापेक्षा अधिक व्यक्ती :-

सहा व त्यापेक्षा अधिक व्यक्ती असणा-या कुटुंबामध्ये या गटाशी संबंधीत चोवीस (२१·२४ टक्के) कर्जे घेणा-या शेतमजुरांमधील सहा (२५ टक्के) शेतमजूर बँकेकडून तर तेवढेच शेतमजूर सावकारांकडून कर्जे घेतात. आठ (३३·३३ टक्के) शेतमजूर मित्रांकडून तर चार (१६·६७ टक्के) शेतमजूर नातेवाईकांकडून कर्जे घेतात. कर्जे घेणा-या या शेतमजुरांपैकी तेरा (५४·१७ टक्के) शेतमजूर १,००० रुपयांपर्यंत, नऊ (३७·५ टक्के) शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंत तर दोन (८·३३ टक्के) शेतमजूर ३,००१ रुपयांपेक्षा जास्त रक्कमेची कर्जे घेतात.

५·जी·० :

भूहीन शेतमजुरांच्या कर्जाच्या रक्कमांचा संबंध त्यांच्या कुटुंबाच्या

आकारमानाशी लावून पुढीलप्रमाणे मांडता येईल. त्यासाठी भूहीन शेतमजुरांच्या कुटुंबाच्या आकारमानाचे वरीलप्रमाणे तीन गट पाडून स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे मांडता येईल.

जी.१.१ : तीन व्यक्तींचे कुटुंब :-

तीन व्यक्तींचे कुटुंब असलेल्या शेतमजुरांची १,००१ ते ३,००० रुपयां - पर्यंत या रक्कमेची तीन (९.६८ टक्के) कर्जे आहेत. बँक व सावकार यांच्याकडून अनुक्रमे एक (३३.३३ टक्के) व दोन (६६.६७ टक्के) शेतमजूर कर्जे घेतात.

जी.१.२ : चार व पाच व्यक्तींचे कुटुंब :-

चार व पाच व्यक्ती कुटुंबामध्ये असणा-या शेतमजुरांनी सतरा (५४.८४ टक्के) कर्जे घेतली त्यापैकी पाच (२९.४१ टक्के) शेतमजूर प्रत्येकी बँकांकडून, सावकारांकडून व मित्रांकडून तर दोन (११.७६ टक्के) शेतमजूर नातेवाईकांकडून कर्जे घेतात. या सर्व शेतमजुरांपैकी अकरा (६४.७१ टक्के) शेतमजूर १,००० रुपयांपर्यंत, पाच (२९.४१ टक्के) शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंत तर एक एक (५.८८ टक्के) शेतमजूर ३,००१ रुपयांपेक्षा जास्त रक्कमेची कर्जे घेतात.

जी.१.३ : सहा व सात पेक्षा जास्त व्यक्तींचे कुटुंब :-

सहा व सात पेक्षा जास्त व्यक्ती असलेल्या कुटुंबातील शेतमजुरांनी अकरा (३५.४८ टक्के) कर्जे घेतली या शेतमजुरांपैकी दोन (१८.१८ टक्के) शेतमजूर बँकेकडून, तीन (२७.२७ टक्के) शेतमजूर सावकारांकडून, चार (३६.३६ टक्के) शेतमजूर मित्रांकडून तर दोन (१८.१८ टक्के) शेतमजूर नातेवाईकांकडून

कर्ज घेतात. कर्ज घेणाऱ्या या सर्व शेतमजुरांपैकी सहा (५४·५५ टक्के) शेतमजूर १,००० रुपयांपर्यंत तर पाच (४५·४५ टक्के) शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतात.

५·एच·१ :

खांडकरी शेतमजुरांच्या कर्जाच्या रक्कमांचे पृथ्थकरण त्यांच्या कुटुंबाच्या आकारमानावर पुढीलप्रमाणे करता येईल.

एच·१·१ : चार व पाच व्यक्ती कुटुंब :-

चार व पाच व्यक्ती कुटुंबामध्ये असणाऱ्या शेतमजुरांनी सात कर्जे घेतली आहेत. या शेतमजुरांमधील दोन (२८·५७ टक्के) शेतमजूर बँकांकडून, तीन (४२·८६ टक्के) शेतमजूर सावकारांकडून तर प्रत्येकी एक (१४·२९ टक्के) शेतमजूर मित्र व नातेवाईक यांच्याकडून कर्ज घेतात. कर्ज घेणाऱ्या या सर्व शेतमजुरांपैकी पाच (७१·४३ टक्के) शेतमजूर, १,००० रुपयांपर्यंत तर दोन (२८·५७ टक्के) शेतमजूर १,००१ ते ३,००० रुपये दरम्यान रक्कमांची कर्जे घेतात.

५·आय·० : कर्जाची परतफेड :-

शेतमजुरांनी घेतलेल्या कर्जाची त्या कर्जाच्या व्याज व मुदत याबद्दल आपण माहिती मिळवली या ठिकाणी आपण शेतमजुरांनी घेतलेली कर्जे वेळेवर परत-फेड होतात का ? होत नसतील तर का होत नाहीत ? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करु शेतमजुरांच्या कर्जाची परतफेड वेळेवर होते का याचे पृथ्थकरण आपण (१) शेतमजुरांचे उत्पन्न (२) शैक्षणिक पातळी (३) जमिनीचे आकारमान व (४) कुटुंबाचे आकारमान या चार मुद्दयांना अनुसरुन पाहणार आहोत. व यासाठी वरील विश्लेषणाप्रमाणेच यांचेही वेगवेगळे विभाग (गट) पाडले आहेत.

आय·१·० :

शेतमजुरांच्या उत्पन्न पातळीवरुन त्यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड वेळेवर होते की नाही हे पाहताना उत्पन्नाचे (१) ३,००० ते ४,५०० रुपयांपर्यंत (२) ४,५०१ ते ६,००० रुपयांपर्यंत (३) ६,००१ ते ९·००० पेक्षा जास्त असे तीन गट पाडून पृथ्थकरण केले असता पुढीलप्रमाणे निष्कर्ष मिळतात·

आय·१·१ :

अल्पभूधारक शेतमजुरांच्या कर्जाच्या परतफेडीचा विचार करीत असता असे दिसून येते की अल्पभूधारक शेतमजुरांमध्ये कर्जाची परतफेड वेळेवर करणारे २९ शेतमजूर आहेत· ११८ कर्जाची परतफेड वेळेवर होत नाही· वार्षिक ३,००० ते ४,५००० रुपये उत्पन्न असणा-या अल्पभूधारक शेतमजुरांपैकी सात (३६·८४ टक्के) जणांची परतफेड वेळेवर होते· तर बारा कर्जांची परतफेड वेळेवर होत नाही· त्यात महत्वानुसारी कमी उत्पन्न व शेती उत्पन्न कमी ही परस्परावलंबी कारणे महत्वाची आहेत·

४,५०१ ते ६,००० रुपये उत्पन्न गटातील ६१ (५१·६९ टक्के) कर्जापैकी दहा (१६·६९ टक्के) कर्जाची परतफेड वेळेवर होते· या गटातसुध्दा उत्पन्न कमी असणे व शेती उत्पन्न कमी असणे हीच महत्वाची कारणे आहेत·

पुढील उत्पन्न गटात (६,००१ रुपयांपेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न) ३८ (३२·२० टक्के) कर्जाचा समावेश होतो· त्यापैकी बारा (३१·५८ टक्के) कर्जाची परतफेड वेळेवर होते· उत्पन्न कमी असल्यामुळे परतफेड न करता या कारणांखालोखाल शेती उत्पादन कमी असणे व धार्मीक, सांस्कृतिक समारंभाचा खर्चही दोन कारणे समान महत्वाची आली आहेत·

कर्ज परतफेड वेळेवर होण्याचे प्रमाण कमी उत्पन्न गटात जास्त आहे. त्या खालोखाल अगदी वरच्या उत्पन्न गटाचा व शेवटी मधल्या उत्पन्न गटाचा क्रमांक लागतो. उत्पन्न कमी असल्यामुळे कर्जफेड वेळेवर करता येत नाही. हे सर्वसाधारण कारण आहे.

आय.१.२ :

भूहीन शेतमजुरांच्या कर्ज परतफेडीची शक्यता त्यांच्या उत्पन्न गटाशी पुढीलप्रमाणे पडताळून पहाता येते. यामध्ये कर्ज घेणाऱ्या बत्तीस संबंधीत शेतमजुरांच्या उत्पन्नाचे वरीलप्रमाणे गट पाडून पुढीलप्रमाणे विश्लेषण मांडता येते.

कोणाही भूहीन शेतमजुरांच्या कर्जाची परतफेड वेळेवर होत नाही.

वार्षिक ३,५०१ ते ४,५०० रुपये उत्पन्न असणाऱ्या ऋणकोच्या बाबतीत उत्पन्न कमी असणे व त्याखालोखाल आजारपण, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम व इतर कारणे सारखीच महत्त्वाची आहेत. ४,५०१ ते ६,००० रुपये उत्पन्न गटात सतरा कर्जापैकी आठ जणांची परतफेडीतील अडचण कमी उत्पन्न असणे हीच आहे. तर इतर कारणे आणि त्याखालोखाल धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमावरील खर्च ही कारणे आहेत. ६,००१ रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या गटातील शेतमजुरांच्या दहा कर्जापैकी पाच कर्जांच्या बाबतीत कमी उत्पन्न व चार जणांच्या बाबतीत इतर कारणे कर्ज परतफेड वेळेवर होऊ न देण्यात येतात.

आय.१.३ :

खंडकरी शेतमजुरांच्या कर्जाच्या परतफेडीच्या शक्यतेची पडताळणी त्यांच्या उत्पन्नाशी केल्यास कोणाही व्यक्तिची कर्जाची परतफेड वेळेवर होत

नाही असे दिसते. सर्व उत्पन्न गटाच्या बाबतीत कमी उत्पन्न असणे हे परतफेड वेळेवर न होण्याचे मुख्य कारण आहे.

या सर्व १२० शेतमजुरांचा विचार करता त्यांनी घेतलेल्या १५१ कर्जांपैकी २९ (१९.२१ टक्के) कर्जाची परतफेड वेळेवर होते. म्हणजे या शेतमजुरांमधील थकबाकीचे प्रमाण ८०.७९ टक्के इतके आहे. भूहीन व खंडकरी शेतमजुरात ते शंभर टक्के आहे. एकूण साठ (३९.७० टक्के) कर्जाची परतफेड शेतमजुरांचे उत्पन्न कमी असल्यामुळे वेळेवर होवू शकत नाही.

५.जे.० :

शैक्षणिक पातळीच्या संदर्भात कर्ज परतफेडीचा विचार केल्यास अल्पभूधारक शेतमजुरांपैकी अशिक्षितात थकबाकीचे प्रमाण ७६.९२ टक्के, प्राथमिक शिक्षितात ७२.७३ टक्के, माध्यमिक व उच्च-माध्यमिक शिक्षण घेतलेल्या शेतमजुरात ८१.८२ टक्के आहे. उत्पन्न कमी असणे, इतर कारणे व धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम अशी महत्वानुसार कारणांची क्रमवारी लावता येते.

भूहीन शेतमजुरात सर्वच थकबाकीदार आहेत व पन्नास टक्के कर्जाच्या बाबतीत उत्पन्न कमी असणे हे कर्ज परतफेड वेळेवर न होण्याचे कारण आहे. त्याखालोखाल ३१.२५ टक्के शेतमजुरांच्या बाबतीत इतर कारणे सांगीतली जातात. त्याचप्रमाणे खंडकरी शेतमजुरही पूर्णपणे थकबाकीदार आहेत. साठ टक्के कर्ज शेतमजुरांचे उत्पन्न कमी असल्यामुळे तर प्रत्येकी वीस टक्के कर्ज गैरसोयीच्या वेळी हप्ता असल्यामुळे व इतर कारणांमुळे वेळेवर फेडली जात नाहीत.

५.के.० :

जमीनीच्या आकारमानाच्या संदर्भात शेतमजुरांच्या कर्ज परतफेडीच्या

शक्यता विचारात घेतल्या असता आपणास शेतजमिनीच्या आकारमानाचे पूर्वीप्रमाणे (१) एक ते तीस आर (२) एकतीस ते साठ आर (३) ६१ आर ते दोन हेक्टर असे तीन गट पाडून पुढीलप्रमाणे विश्लेषण करता येईल.

शेतजमिनीच्या आकाराच्या संदर्भात थकबाकीचा विचार करता असे दिसून येते की तीस आर क्षेत्रफळापर्यंत जमीन असणा-या अल्पभूधारक शेतमजुरात थकबाकीचे प्रमाण ७३.४४ टक्के आहे. ३१ ते ६० आर क्षेत्रफळाची जमीन असणा-यात ते ७७.७७ टक्के व ६१ आर ते दोन हेक्टर जमीन असणा-या शेतमजुरात हे प्रमाण तितकेच म्हणजे ७७.७७ टक्के आहे. म्हणजे जमिनीच्या क्षेत्रफळाबरोबर थकबाकीचे प्रमाण सीमान्त प्रमाणात का होईना पण वाढलेले दिसते.

तीस आर इतकी जमीन असणा-या अल्पभूधारक शेतमजुरांपैकी सत्तेचाळीस कर्जांची परतफेड वेळेवर झालेली नाही. त्यापैकी बावीस (४६.८१ टक्के) कमी उत्पन्नामुळे, दहा कर्जे (२१.२८ टक्के) इतर कारणांमुळे व प्रत्येकी सात (१४.८९ टक्के) कर्जे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांवरील खर्चामुळे व शेती उत्पन्न कमी असल्यामुळे वेळेवर परत फेडली गेली नाहीत.

एकतीस आर ते साठ आर क्षेत्रफळाची जमीन असणा-या शेतमजूरांच्या पस्तीस थकलेल्या कर्जांपैकी सोळा (४५.७१ टक्के) कर्जे उत्पन्न कमी असल्यामुळे, १० (२८.५७ टक्के) कर्जे शेती उत्पन्न कमी असल्यामुळे तर प्रत्येकी तीन (८.५७ टक्के) कर्जे आजारपण, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम व इतर कारणांमुळे वेळेवर परत केली गेली नाहीत.

६१ आर ते दोन हेक्टर जमीन असणा-या अल्पभूधारक शेतमजुरांच्या थकलेल्या सात कर्जांपैकी तीन (४२.८६ टक्के) कर्जे शेती उत्पन्न कमी असल्यामुळे तर दोन (२८.५७ टक्के) कर्जे शेतक-यांचे उत्पन्न कमी असल्यामुळे फेडली गेली नाहीत.

११ ते वीस आर जमीन असणा-या खांडकरी शेतमजुरांचे कर्ज कमी उत्पन्नामुळे, एक्केचाळीस ते पन्नास आर जमीनीच्या क्षेत्रफळांतील - शेतमजुरांचे प्रत्येकी एक कर्ज कमी उत्पन्न व इतर कारणांमुळे आणि ८१ आर ते दोन हेक्टर जमीन धारण करणा-या शेतमजुरांच्या प्रत्येकी एक कर्जाची परतफेड कमी उत्पन्न व गैरसोयीच्या वेळी हप्ता असल्यामुळे वेळेवर होवू शकली नाही.

५.एल.० :

शेतमजुरांच्या थकबाकीच्या कारणांची मिमांसा कुटुंबाच्या आकारमानावरून केली असता अल्पभूधारक शेतमजुरांच्या बाबतीत असे दिसून येते की तीन व्यक्तींपर्यंत कुटुंब असलेल्या शेतमजुरांच्या एकोणीस कर्जांपैकी पाच (२६.३२ टक्के) कर्जाची परतफेड वेळेवर झाली म्हणजे थकबाकीचे प्रमाण ७३.६८ टक्के आहे. त्यात सहा (४२.८६ टक्के) कर्जे उत्पन्न कमी असल्यामुळे तर पाच (३५.७१ टक्के) शेती उत्पन्न कमी असल्यामुळे थकीत होती.

चार व पाच व्यक्ती असणा-या कुटुंबात कर्जाच्या थकबाकीचे प्रमाण ७७.९२ टक्के आहे. ४३.३३ टक्के कर्जे कुटुंबाचे उत्पन्न कमी असल्यामुळे, वीस टक्के शेती उत्पन्न कमी असल्यामुळे १६.६६ टक्के कर्जे इतर कारणांमुळे तर पंधरा टक्के कर्जे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमात खर्च होत असल्यामुळे फेडावयाची राहिली.

सहा व त्यापेक्षा जास्त व्यक्ती कुटुंबात असणा-या शेतमजुरात थकबाकीचे प्रमाण ६८.१८ टक्के आहे. त्यात आठ कर्जे ऋणकोचे उत्पन्न कमी असल्यामुळे व तीन कर्जे प्रत्येकी शेती उत्पन्न कमी असल्यामुळे व इतर कारणामुळे फेडावयाची राहिली.

म्हणजे कुटुंबाच्या आकारमानाचा कर्जाच्या थकबाकीशी तसा संबंध लागत नाही. कारण पहिल्या कुटुंब आकारमान गटातून दुस-या कुटुंब आकारमान गटाकडे आलो असता थकबाकीचे प्रमाण वाढले पण तिस-या कुटुंब आकारमान गटात हे प्रमाण कमी झालेले दिसते.

भूहीन शेतमजुरांच्या तीन व्यक्ती असणा-या कुटुंबात चारापैकी दोन कर्जे कमी उत्पन्नामुळे तर एक कर्ज प्रत्येकी आजारपण व सांस्कृतिक व धार्मिक कार्यावरील खर्चामुळे वेळेवर फेडले गेले नाही. चार व पाच व्यक्ती असलेल्या कुटुंबात आठरापैकी सात (३८.८९ टक्के) कर्जे कर्जदाराच्या कमी उत्पन्नामुळे, तर सहा (३३.३३ टक्के) कर्जे इतर कारणांमुळे परत फेडावयाची राहिली. सहा व त्यापेक्षा जास्त आकारमानाच्या कुटुंबातील दहा थकीत कर्जापैकी पाच कमी उत्पन्नामुळे तर चार इतर कारणांमुळे फेडावयाची राहिली.

खंडकरी शेतमजुरांच्या पाच थकलेल्या कर्जापैकी तीन कर्जे कमी उत्पन्नामुळे व प्रत्येकी एक कर्ज गैरसोयीच्या वेळी हप्ता असल्यामुळे व इतर कारणामुळे मागे राहिली आहेत.

या प्रकरणात पहिल्या विभागात शेतमजुरांच्या कर्जाचा विविध अंगानी अभ्यास केला आहे. सर्वेक्षणात समाविष्ट केलेल्या १२० शेतमजुरांपैकी २३.३३ टक्के शेतमजूर कर्ज न घेणारे आहेत. आजही बँकाखालोखाल सावकार या लोकांची कर्जाची गरज भागवीत असतात. बिनमुदतीच्या कर्जाचे एकूण कर्जाशी असलेले प्रमाण ७१.५२ टक्के आहे. यावरुन शेतमजुरांच्या उत्पन्नातील अशाश्वतता व कर्जफेडीची त्यांची असमर्थता दिसून येते. या शेतमजुरांनी बँकांकडून घेतलेली कर्जे मुख्यत्वे एक ते तीन वर्षे मुदतीची आहेत. बँकांकडून घेतलेल्या कर्जावर कमीत कमी व्याजदर तीन टक्क्यांपर्यंत तर कमाल व्याजदर पंधरा टक्के आहे. मित्र व नातेवाईकांकडून घेतलेली बहुतेक कर्जे बिनव्याजी आहेत. सावकारांकडून घेतलेल्या सत्तेचाळीस कर्जापैकी वीस (४२.५५ टक्के) साठ टक्क्यांपेक्षा जास्त व्याजदराची तर चौदा कर्जे (२९.७९ टक्के) पंधरा ते साठ टक्के व्याजदराची आहेत.

या शेतमजुरांनी घेतलेली कर्जे ५,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेची नाहीत. त्यात बँकेकडील कर्जे जास्त रकमेची आहेत. सावकारांकडील कर्जे जास्तीत जास्त २,००० रुपयांपर्यंतची आहेत. जसजशी उत्पन्न पातळी वाढत जाते तसे कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण व कर्जाची रक्कम वाढत जाताना दिसते. शैक्षणिक पातळी व कर्जबाजारीपणाचे प्रमाण अथवा कर्जाची रक्कम वाढत जाताना दिसते. शैक्षणिक पातळी व कर्जबाजारीपणाचे प्रमाण अथवा कर्जाची रक्कम यांचा संबंध आढळत नाही. तसेच अल्पभूधारक आणि खंडकरी शेतमजूर यांच्याकडील शेतजमीनीचे आकारमान व त्यांनी घेतलेल्या कर्जाची रक्कम यांचा संबंध दिसून येत नाही. सर्वजण सारखेच कर्जबाजारी दिसून येतात. लहान आकाराची तसेच मोठ्या आकाराची कुटुंबे सारख्याच प्रमाणात कर्जबाजारी आहेत.

कर्जफेड वेळेवर होण्याचे प्रमाण कमी उत्पन्न गटात जास्त आहे. त्याखालोखाल अगदी वरच्या उत्पन्न गटाचा व शेवटी मधल्या उत्पन्न गटाचा क्रमांक लागतो. उत्पन्न कमी असल्यामुळे कर्जफेड वेळेवर करता येत नाही. हे सर्वसाधारण कारण आहे. भूहीन व खंडकरी शेतकऱ्यात कर्ज व थकबाकीचे प्रमाण शंभर टक्के आहे. सर्व कर्जात थकबाकीचे प्रमाण ८०.७९ टक्के आहे. शैक्षणिक पातळीचा कर्ज परतफेडीशी काही संबंध दिसून येत नाही. तसेच शेतीच्या आकारमानाशी कर्ज थकबाकीचा संबंध दिसून येत नाही. पहिल्या कुटुंब आकारमान गटातून दुसऱ्या गटाकडे येताना थकबाकीचे प्रमाण वाढलेले दिसते. पण तिसऱ्या कुटुंब आकारमान गटात ते कमी झालेले आढळते.

====xx====